




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक ३१० * नांदेड * रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# देशभर गाजलेल्या 'नीट पेपरफुटी' प्रकरणात १४ आरोपींविरोधात आरोप निश्चित

## २५ नोव्हेंबरपासून खटला सुरू होणार




**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशभरात गाजलेल्या नीट पेपरफुटीचं केंद्रस्थान महाराष्ट्र निघाले होते. वैद्यकीय प्रवेश परीक्षेसाठी घेण्यात येणाऱ्या या नीट परीक्षेच्या पेपरफुटीचा तपास सीबीआयकडे देण्यात आला असून सीबीआयानेही धडाडीने कारवाई करत १४ आरोपींना अटक केली आहे. विशेष म्हणजे, नाशिक, पुणे आणि लातूरमधून सर्वांना अटक करण्यात आली होती. त्यामध्ये, लातूरमधील प्रसिद्ध मोटेगावकर क्लासेसच्या संचालकांनाही अटक करण्यात आली आहे. आता, याप्रकरणी न्यायालयात सर्वच १४ आरोपींवर आरोप निश्चित करण्यात आले असून २५ नोव्हेंबरपासून खटला सुरू होणार आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणात अटकेत असलेल्या सर्वच १४ आरोपींविरोधात न्यायालयाने औपचारिक आरोप निश्चित केले आहेत. मात्र, सर्व आरोपींनी आरोप मान्य करण्यास नकार देत खटल्याला सामोरे जाण्याची भूमिका घेतली. त्यामुळे, याप्रकरणी २५ नोव्हेंबरपासून खटल्याला सुरुवात होणार आहे. आरोप निश्चित करण्यात आलेल्या कलमांमध्ये फसवणूक, विश्वासघात, भ्रष्टाचार आणि परीक्षेतील गैरप्रकारांशी संबंधित तरतुदींचा समावेश आहे. नॅशनल टेस्टींग एजन्सी म्हणजेच एनटीएशी तज्ज्ञ म्हणून संबंधित असलेल्या मनीषा गुरुनाथ मांढरे, पी. व्ही. कुलकर्णी आणि मनीषा संजय हवालदार यांच्याविरोधात सार्वजनिक सेवक या नात्याने भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गतही आरोप निश्चित करण्यात आले आहेत. त्यामुळे, देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या या नीट पेपरफुटी घोटाळ्याच्या खटल्यात न्यायालयात काय काय युक्तिवाद केला जातात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

दरम्यान, ३ मे रोजीच्या नीट परीक्षेचा पेपर फुटल्यानंतर ही परीक्षा एनटीएकडून रद्द करण्यात आली होती. त्यानंतर, २० जून रोजी पुन्हा परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकालही जाहीर करण्यात आला आहे. मात्र, ३ मे रोजीच्या पेपरफुटीप्रकरणातील आरोपींवर आणि संबंधित परीक्षेचा पेपर घेणाऱ्या लाभार्थ्यांवरही कारवाई केली जात आहे. तर, नीट पेपरफुटीप्रकरणानंतर दिल्लीतील जंतरमंतरवर मोठं आंदोलन उभारलं होतं. या आंदोलनाची धग देशभर पसरली, त्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला होता.

नीट पेपरफुटी प्रकरणात लातूरमधील प्रसिद्ध मोटेगावकर कुटुंबाला मोठा धक्का बसलाय. आरसीसी कोचिंग क्लासेसचे संचालक आणि रसायनशास्त्राचे शिक्षक शिवराज मोटेगावकर यांचा मुलगा आदित्य मोटेगावकर याच्यावर आता दोन वर्षांसाठी नीट परीक्षेत बंदी घालण्यात आली आहे.

# हदगाव तालुक्यातील शेतकरी सुधाकर आणि प्रणिता शिंदे या वारकरी दाम्पत्याला कार्तिकी एकादशीच्या महापूजेचा मान

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह विठ्ठल-रूक्मिणी मंदिरात केली महापूजा



**पंढरपूर (प्रतिनिधी)–** पंढरपूर येथील विठ्ठल-रूक्मिणी मंदिरात कार्तिकी एकादशीनिमित्त महापूजेचा मान नांदेड जिल्ह्याच्या हदगाव तालुक्यातील शेतकरी सुधाकर आणि प्रणिता शिंदे या वारकरी दाम्पत्याला मिळाला. यावेळी त्यांची राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या पत्नीसमवेत महापूजा केली.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील दुष्काळी परिस्थिती दूर होऊन बळीराजा आणि सर्वसामान्य जनतेच्या जीवनात सुख, समृद्धी व समाधान नांदू दे, असे साकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्री विठ्ठलाच्या चरणी घातले.

यावेळी फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, खासदार श्रीकांत शिंदे, खासदार संजय जाधव, आमदार अभिजित पाटील, बापूसाहेब पठारे, राजू खरे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव, समिती सदस्य व अन्य मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, पंढरपूर येथे कार्तिकी यात्रेदरम्यान लाखो भाविक श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी येतात. सध्या संपूर्ण पंढरपूर भक्तिमय वातावरणाने भारावून गेले आहे. आपण सर्वजण येथे वारकरी भावनेने येतो. सर्वसामान्य वारकऱ्यांना श्री विठ्ठलाचे दर्शन सुलभतेने व कमी वेळेत मिळावे, यासाठी व्हीआयपी दर्शन बंद करण्यात आले आहे. त्यामुळे दर्शनासाठी लागणारा वेळ कमी होऊन वारकऱ्यांना लवकर दर्शनाचा लाभ मिळत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

# मंत्री नरहरी झिरवाळांचे पीए डॉ. गाडेंचं निलंबन

**मुंबई (प्रतिनिधी)–** मंत्री नरहरी झिरवाळ यांचे तत्कालीन पीए डॉ. रामदास गाडे यांचं निलंबन करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. बेकायदेशीर धाड प्रकरणी मुख्यमंत्री कार्यालयातून सूचना देण्यात आल्या आणि अखेर आदेश निघाले असल्याची माहिती आहे.

झिरवळ यांचे तत्कालीन पीए डॉ. रामदास गाडे पशुसंवर्धन खात्याचे अधिकारी त्यांना उसनवारी तत्वावर अन्न औषध प्रशासन खात्यात घेण्यात आले होते. गाडे यांचा खात्याकडून निलंबनाचा प्रस्ताव मुख्यमंत्री कार्यालयात गेला होता. मुख्यमंत्री कार्यालयाकडून निलंबनाचे आदेश देण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे.

रामदास गाडे हे पशु व दुग्ध विकास खात्याचे अधिकारी आहेत, त्या खात्यातून उसनवारी तत्वावर अन्न व औषध प्रशासन खात्यामध्ये घेण्यात आले होते, त्यामुळे हा प्रस्ताव अन्न औषध प्रशासनाचा नाही तर दुग्ध विकास खात्याकडून राज्य सरकारला देण्यात आला होता, मुख्यमंत्री कार्यालयामध्ये बरेच दिवस तर पेंडिंग होता, आता त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे, आणि रामदास गाडे यांना निलंबित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. थेट मुख्यमंत्री कार्यालयातून ही कारवाई करण्यात आली आहे.

राज्याचे अन्न आणि औषध प्रशासन (एफडीए) मंत्री नरहरी झिरवाळ यांचे तत्कालीन खासगी सचिव आणि पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय कार्यालयात साहाय्यक आयुक्त असणारे डॉ. रामदास गाडे यांच्या निलंबनाचे आदेश पशुसंवर्धन विभागाने काढले. धाडीच्या प्रकरणाची विस्तृत चौकशी झाली. मंत्री नरहरी झिरवाळ यांचे तत्कालीन खासगी सचिव रामदास गाडे यांनी सर्व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यंत्रणेवर दबाव आणून, बेकायदेशीर निर्देश देत, कायद्याच्या कसोटीवर न टिकणारी कारवाई करण्यास भाग पाडले, असा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला.

# युद्ध पेटलं, रशियाचा भीषण मिसाईल हल्ला, २५ इमारती उद्धवस्त



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** युक्रेन आणि रशियामध्ये युद्ध सुरूच आहे. रशियाकडून युक्रेनवर भीषण मिसाईल हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यामध्ये दोन जणांचा मृत्यू झाला असून, साठपेक्षा अधिक नागरिक जखमी झाले आहेत. रशियाकडून शनिवारी युक्रेनची राजधानी कीववर भीषण मिसाईल हल्ला करण्यात आला आहे.

युक्रेनचे राष्ट्रपती झेलेंस्की यांचं निवासस्थान देखील कीवमध्येच आहे. रशियाकडून झेलेंस्की यांचं निवासस्थान असलेल्या शहरालाच आता निशाणा बनवण्यात आलं आहे. त्यामुळे आता हे युद्ध आणखी भडकण्याची शक्यता आहे. रशियाकडून कीववर भीषण मिसाईल हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात दोन नागरिकांचा मृत्यू झाला असून, अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत.

# राज्यात थंडीचा जोर आणखी वाढणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** नोव्हेंबर महिना आता संपत आला आहे, लवकरच डिसेंबर महिन्याला सुरुवात होणार आहे. आता थंडीची चाहुल लागण्यास सुरुवात झाली आहे. सध्या देशभरात काहीसं विचित्र वातावरण पहायला मिळत आहे. काही राज्यांमध्ये थंडीचा कडाका वाढला आहे. महाराष्ट्रातही काही जिल्ह्यांमध्ये थंडी चांगलीच जाणवू लागली असून पुढील काही दिवसांत आणखी थंडीचा जोर वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

महाराष्ट्रात थंडीचा जोर वाढत असून, शनिवारी जळगाव येथे राज्यातील नीचांकी ८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे जळगाव, धुळे आणि नाशिक जिल्ह्यांत गारठा वाढला आहे. वादळाच्या प्रभावामुळे उर्वरित महाराष्ट्रात थंडीचा प्रभाव कायम आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील आठवडाभरात महाराष्ट्रासह मध्य, उत्तर आणि वायव्य भारतात थंडीचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे.

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या 'अकवान' वादळाने शुक्रवारी सकाळी दक्षिण ओदिशातील गोपाळपूर किनारपट्टीजवळ ताशी ९० ते १०० किलोमीटर वेगाच्या वाऱ्यांसह धडक दिली. मात्र, जमिनीवर येण्यापूर्वीच वादळाची तीव्रता कमी झाली. या वादळाच्या प्रभावामुळे उत्तर आंध्र प्रदेश आणि दक्षिण ओदिशामध्ये मुसळधार पाऊस झाला. शुक्रवारी सकाळी साडेसातच्या सुमारास वादळाच्या जमिनीवर धडकण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. समुद्रातील थंड पाणी आणि जमिनीवरील थंड वाऱ्यांमुळे वादळाला अपेक्षित तीव्रता मिळाली नाही. गोपाळपूर किनारपट्टीजवळ धडकल्यानंतर त्याचा वेग आणि प्रभाव आणखी कमी झाला. ओडिशाच्या किनारपट्टी भागात सोसाट्याच्या वाऱ्यांसह मुसळधार पाऊस पडला.

# राष्ट्रीय महामार्गावर धोकादायक वळणं; किनवट-सारखणी महामार्गावर कार आणि दुचाकीच्या धडकेत तरूण ठार

**किनवट (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ (अ) वरील राजगड समोरील धोकादायक वळणावर शनिवारी दुपारी कार आणि दुचाकीच्या भीषण धडकेत एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर दोघे किशोरवयीन मुले गंभीर जखमी झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.



या अपघातात मारेगाव खालचे येथील अनिकेत राजू राठोड (वय २२) याचा दुर्दैवी अंत झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, अपघातानंतर महामार्गावर नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. सारखणीच्या दिशेने भरधाव वेगाने जाणारी क्रेटा कार (क्रमांक एम.एच.२६ सी.पी. ७०७२ आणि सारखणीकडून किनवटच्या दिशेने येणारी पल्सर मोटारसायकल यांच्यात राजगड समोरील वळणावर समोरासमोर जोरदार धडक झाली. मोटारसायकलवर तिघे जण स्वार होते. धडक इतकी भीषण होती की,यात अनिकेत राजू राठोड याला गंभीर मार लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.तर दुचाकीवरील अनुराग वामन चव्हाण (वय १५) आणि लखन विजय राठोड (वय १६, दोघेही रा. चिंचखेड) हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेत दोन्ही जखमींना उपचारासाठी गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही. टी. साठे यांनी दोन्ही जखमींवर तातडीने प्राथमिक उपचार केले. मात्र, दोघांचीही प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना तेलंगणातील आदिलाबाद येथे पाठविण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार यांच्या सूचनेनुसार पोलीस कर्मचारी अतिश चव्हाण यांनी घटनास्थळी धाव घेऊन वाहतूक सुरळीत केली. त्यानंतर पंचनामा करण्यात आला. अपघातप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भेसळयुक्त दारू प्यायल्याने १५ जणांचा मृत्यू, तर १८० जणांवर उपचार सुरू

**चंदेल (प्रतिनिधी)–** मणिपूरमध्ये भेसळयुक्त दारू प्यायल्याने १५ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तसेच तब्बल १८० जणांची प्रकृती बिघडली असून त्यांच्यावर रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर संपूर्ण राज्यात मोठी खळबळ उडाली आहे. आता प्रशासनाकडून तातडीने मदतकार्य सुरू करण्यात आलं असून या घटनेची चौकशी करण्यात येत आहे.

मणिपूरमधील चंदेल जिल्ह्यात मागच्या ४८ तासांत संशयास्पद भेसळयुक्त दारू प्यायल्यामुळे १५ जणांचा मृत्यू झाला आणि आतापर्यंत १८० पेक्षा जास्त जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. ही घटना घडल्यानंतर जिल्हा प्रशासनाने हेल्थ डव्हायझरी जारी केली आहे.


चंदेलच्या पोलीस अधीक्षकांनी जारी केलेल्या अधिकृत निवेदनात आधी ८ जणांच्या मृत्यूची पुष्टी करण्यात आली होती. पोलिसांच्या निवेदनानुसार, काही पीडितांचा मृत्यू त्यांच्या घरीच झाला, तर काहींचा मृत्यू रुग्णालयात नेत असताना किंवा कम्युनिटी हेल्थ सेंटरमध्ये दाखल केल्यानंतर झाला. १८ ते २० नोव्हेंबर या दरम्यान हे मृत्यू झाले आहेत.

# अर्धापूर गावातील कुरबुरीतून पंचायत समिती परिसरात संचालकास सिनेस्टाईल मारहाण

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील एका गावातील अंतर्गत राजकाणातील कुरबुर व ग्रामपंचायतीच्या कामाच्या वादातून शुक्रवारी दुपारच्या सुमारास पंचायत समिती व तहसील परिसरात कारखान्याच्या एका संचालकाला सिनेस्टाईलने मारहाण झाल्याची घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित गावातील सार्वजनिक कामांमध्ये संचालकाकडून सातत्याने हस्तक्षेप होत असल्याचा आरोप गावातील एका गटाकडून केला जात होता. याबाबत अनेकदा समज देऊनही परिस्थिती जैसे थे राहिल्याने संचालक एका वरिष्ठ अधिकाऱ्यासमोर आपल्या पदाचा प्रभाव दाखवून दबाव आणण्याचा प्रयत्न करत असल्याची माहिती प्रतिस्पर्धी गटाला मिळाली. त्यानंतर पंचायत समिती व तहसील आवारात दोन्ही गटांत वाद होऊन संबंधित संचालकाला सिनेस्टाईल मारहाण करण्यात आल्याची माहिती आहे. या घटनेच्या वेळी परिसरात संचालकाच्या गटातील उपस्थित असलेल्या काही समर्थकांनी मध्यस्थी न करता दबा धरून बघ्याची भूमिका घेतली तर काहींनी तेथून काढता पाय घेतल्याचे प्रत्यक्षदर्शींकडून सांगण्यात येते.

या प्रकरणी एकाच्या फिर्यादीवरून एनसी दाखल करण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या सिनेस्टाईल मारहाणीच्या घटनेनंतर तालुक्यात उलट-सुलट चर्चांना उधाण आले असून वादग्रस्त कारवाया करणाऱ्यांमध्ये आणि त्यांना पडद्यामागून मदत करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. आता झेन जी सक्रिय झाल्यामुळे हा वाद शमणार की याचे पडसाद आगामी काळात उमटणार याकडे राजकीय मंडळींचे लक्ष लागले आहे.



# यंदा इतिहासातील सर्वांत कमी पेरणी; १९७२ पेक्षाही भीषण दुष्काळ

**मुंबई (प्रतिनिधी)–** रब्बी हंगामातील पेरणीच्या आकडेवारीची तुलना करता १९७२ च्या दुष्काळापेक्षाही यंदाचा दुष्काळ भीषण ठरला आहे. १९७२-७३ च्या हंगामात ४७.२९ लाख हेक्टरवर पेरणी झाली होती. यंदा आजअखेर १४ लाख ७४ हजार ३०४ हेक्टरवर पेरणी झाली आहे. डिसेंबरअखेरपर्यंत पेरण्या होतात, त्यामुळे यंदा जेमतेम २० ते २५ लाख हेक्टरपर्यंत पेरणीचा अंदाज आहे. राज्याच्या रब्बी हंगामाच्या इतिहासातील ही सर्वात कमी पेरणी ठरण्याची भीती आहे.

हवामान विभागासह विविध जागतिक हवामान संस्थांनी सध्या प्रशांत महासागरात सक्रीय असलेला एल निनो हा सुपर म्हणजेच शक्तीशाली एल निनो असल्याचे जाहीर केले आहे. मोसमी पावसावर एल निनोचा थेट परिणाम झाल्यामुळे



राज्यात सरासरीच्या तुलनेत १९ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे. सोलापुरात सर्वात कमी सरासरीच्या तुलनेत ५९ टक्के कमी पाऊस पडला आहे. अपवाद वगळता सर्वच जिल्ह्यांत कमी पाऊस झाला आहे. पडलेला पाऊसही जुलै महिन्यातील पंधरा दिवसांतच पडला आहे. त्यामुळे खरीप हंगाम वाया गेला. राज्याच्या ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची शाश्वती नसल्यामुळे रब्बी पेरण्या अत्यंत संथ गतीने सुरू आहेत.

कृषी विभागाकडे १९६० पासूनची रब्बी हंगामातील पेरणीची आकडेवारी आहे. पेरणी क्षेत्राची तुलना करता, यंदाचा दुष्काळ आजवरचा सर्वात भीषण ठरला आहे. राज्यातील रब्बी हंगामातील सरासरी पेरणी क्षेत्र ५५ ते ६० लाख हेक्टर आहे. १९७२-७३ च्या हंगामात एकूण ४७.२९ लाख हेक्टरवर पेरणी झाली होती. त्यात अन्नधान्य पिके ३६.६४, कडधान्य पिके ४.३१ आणि तेलबियांची ६.३४ लाख हेक्टरवर पेरणी झाली होती. यंदा आजवर १४ लाख ७४ हजार ३०४ लाख हेक्टरवर पेरणी झाली आहे. त्यात अन्नधान्य पिके ७ लाख ७९ हजार ८१२ हेक्टर, कडधान्यांची ६ लाख ७८ हजार ३८५ हेक्टर आणि तेलबियांची १६ हजार १०६ हेक्टरवर पेरणी झाली आहे. यंदा डिसेंबरअखेर पेरण्या होतील. पण, एकूण रब्बी पेरा २० ते २५ लाख हेक्टरच्या वर जाण्याची कोणतीही शक्यता नाही. राज्याच्या इतिहासात आजवरच्या कमी पेर्यांची नोंद १९९१-९२ च्या हंगामात झाली होती, त्या वर्षी ४० लाख हेक्टरवर पेरा झाला होता.

# बांगलादेशात पुन्हा हिंसाचाराचा वणवा, बॉम्बस्फोट अन् जाळपोळ

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** शेजारील बांगलादेशात पुन्हा एकदा राजकीय संघर्षाचा वणवा पेटला असून, या संपूर्ण घडामोडींच्या केंद्रस्थानी माजी पंतप्रधान शेख हसीना आहेत. शेख हसीना यांनी डिसेंबर महिन्यात मायदेशी परतण्याची घोषणा केल्यानंतर बांगलादेशच्या राजकारणात मोठा भूकंप झाला आहे. या पार्श्वभूमीवर बंदी घातलेल्या अवामी लीगने पुकारलेल्या देशव्यापी बंददरम्यान अनेक जिल्ह्यांमध्ये जाळपोळ, बॉम्बस्फोट आणि हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत.

दुसरीकडे, बांगलादेशचे विद्यमान पंतप्रधान तारिक रहमान यांनी या अस्थिरतेमागे थेट नाव घेणे टाळत भारताच्या दिशेने अप्रत्यक्ष अंगुलीनिर्देश केल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे हा संघर्ष आता केवळ हसीना विरुद्ध रहमान इतकाच मर्यादित राहिलेला नसून, हसीना यांचे भारतातील वास्तव्य, त्यांच्या प्रत्यार्पणाचा पेच आणि भारत-बांगलादेश संबंधांमधील तणावामुळे दक्षिण आशियाच्या राजकारणात नवा भू-राजकीय संघर्ष उभा राहण्याची चिन्हे दिसत आहेत.

२०२६ मध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये अवामी लीगवर निवडणूक लढवण्यास बंदी घालण्यात आली आणि तारिक रहमान यांच्या बीएनपी पक्षाची सत्ता आली. आता हसीनांच्या परतण्याच्या घोषणेनंतर अवामी लीगने आक्रमक पवित्रा घेतल्याचे चित्र असून, २२ ते २८ जिल्ह्यांमध्ये जाळपोळ आणि बॉम्बस्फोटांच्या घटना घडल्या आहेत. खुद्द मोहम्मद युनूस यांच्या चितगावमधील वडिलोपार्जित घरालाही आग लावण्यात आल्याची घटना समोर आली आहे.

## वऱ्हाडी कथा

# बकूळा अन् थो...

चांदन टिपूर आभाळाच्या अंगअंगावर पडलं होतं.

चंद्र अर्ध गोलाकारात होता. आकाश काळेभोर एखाद्या नांगरलेल्या शेताप्रमाणे भासत होतं. बकूळा दामोदरच्या कुशीत घट्ट बिलगून होती. तीच रोमनरोम शहारत होत. काळजात सौख्याचे अमृत पाझरत होतं. गावात निरव शांतता पसरली होती. रातकिड्यांची किरकिर अधूनमधून ऐकू येत होती. बकूळाचे ओठ वावटळीत झाडाचे पान थरथरावे तसे थरथरत होते. अंगावर काटा ऊभा झाला होता. दोघाच्या मिठीत वाऱ्याला पायबंद घातला गैला होता. दोघात सुताचे सुध्दा अंतर नव्हते. ते दोघही प्रणय सुखाच्या डोहात डुंबून तल्लीन होऊन मग्न नी एकरूप झाले होते. भाजी शिजतांना भगून्यावर ज्या प्रमाणे झाकन ठेवावे त्याच प्रमाणे दामोदरने बकूळाच्या ओंठावर अगदी अलगद ओठ ठेवले होते. टाकसळीगत चुंबनांचा वर्षाव होत होता. दोघही पिसाळले होते. बकूळेच्या काळजाची धडधड सुरांसारखी जलद गतीने होत होती आणि दोघही संसार सुख घेण्यात रममाण, एककल्ली झाले होते. तेवढ्यात दाराची साखळी वाजली. दोघही घाबरले नीट सावरत. बकूळा दार ऊघडायला गेली. दार ऊघडल गेलं. दारात ऊभा होता भैरव. भैरव बकुळेला एकटक पाहत होता. तीचे केस विस्कटलेले होते. माथ्यावरलं कुकू मेनाला सोडूनं चवभवतालं मळवट भरल्यासारखं पसरलं होतं. ओठ पांढरेफट्ट पडले होते. लुगळ्याचा पदर छातीवरूनं सरकलेला होता., चोळी तंग होती. भैरवची नजर कुतऱ्यागत तीच्या अंगावरूनं बोटी बघावी तशी फिरली होती. बकूळा अंगपिंडान ठस्स भरीव होती. तीचा ऊभार लेणीगत रेखीव होता. चेहरा देखना, हसरा आणि कुणालेली भूल पाडेल असा होता. गरीबीम ळे बकूळा दामोदरच्या झोळित पडली होती. भैरव पाटील हा गावातला मोठा जमीनदार. दामोदर हा भैरवकडे सालगडी म्हणून काम ाला होता. दामोदर पडेल ते काम करत असे. मग शेतीतली असो वा घरातली. दामोदरच बकूळा सोबत लग्न होऊनं अवघे सहाच महिने झाले होते. लग्न झाल्यावर दामोदर आणि बकूळा दर्शनाला पाटलाच्या वाळ्यात गेले होते. तेव्हापासून बकूळा भैरव पाटलाच्या नजरेत बुबळावानी बसली होती. भैरव विचार करीत असे. ह्या पाखराले कवा मुठीत धरतो म्हणून.

दामोदरन बायकोले आवाज देत म्हतल. बकुळे कोन आलं व दारात. धाकटे मालक हायेत. अरे बापरे! देवाचे पाय माह्या झोपळीले लागले..असा पुटपुटत थो ऊठला. केस सावरत दारात आला. मालक रामराम. दामोदर दोन्ही हात जोडून नी छातीवर धरूनं अंत्यत अदबीने, नम्रपणे मान खाली घालूनं बोलला. रामराम दामोदर. ईकळे गरिबाच्या झोपळीत कस येनं केलं सरकार. आपण निरोप धाळ्ळा असता त मीच आलो असतो ना. कामून बापा मी तुह्या घरी आलो त चालत नाही काय? तुमचंच घर हाय सरकार. तुमचीच देन हाय हे घर. काय काम होत सरकार. दमोदर खाली मान घालूनं हळूवार बोलला. घरात बलावशीन काय नायी. का अथिसाच दारात सांगू. माफ करा सरकार. या घरात या. अय बकुळे पिळं टाक सरकारले बसाले. पिळं टाकतानी बकूळा वाकली. भैरवची चोरटी नजर बकूळेच्या छातीवरूनं भुर्रकन फिरली. बकूळा कावरी बावरी झाली. तीनं पदर छातीवर ओढून धरला. बकूळा तशी हुशार होती. माणसाची चांगली आणि वाईट नजर ओळ-खत होती. दामोदर जवार घेऊन तालुक्यात जा लागते तुले ऊद्या. जातोना सरकार. भैरव बकूळे कडे शिकारीगत बघायला लागला. दामोदर जरा खाकरूनं बोल्ला. बकुळे सरकारले चा ठुय. दुद जरा जास्त टाकजो अन् साखऱ्या जरा कमी. सरकारले फिक्का चा आवळते.

बकुळाने चूल पेटवली. गंजूली ठेवली. पानी, चा पत्ती, गवतीचा, साखऱ्या, दोळा, अदरक टाकलं. चा ले गदका आला तसं दूध टाकलं. चा टुटलेल्या कानाच्या सिंगलावर चायनी धरून भरला गेला. बकूळेनं दोन कप शिगोर भरून आनले. बोट जयत होते. एक कप भैरव पुढे नेला. त्यानं पापन्या ऊचलूनं बकूळेकडे पाहिलं नंतर वाफाळत्या शिंगलाकडे पाहिलं आणि बकूळेचे बोट दामोदरच्या न कळत दाबले तशी बकूळा घाबरली आणि तीने शिंगल सोडला. चहा चे शिंतोडे बकूळेच्या लुगड्यावर आणि भैरवच्या धोतरावर ऊडले. तसा दामोदर किंचाळला. काय बकूळे कशी ग तू चा मातीत घातला. हा माझा शिंगल दे सरकारला. मी भाकर पलटून येते. करपून जाईन भाकर. अस खोटनाट बोलूनं बकूळा रांधन घरात पळाली. दामोदरनं चहा अर्धा अर्धा केला. दोघे पिले आणि भैरव दाराच्या चौकटीतूनं वळूनं पाहत बोलला. लवकर ये ऊद्या मंग दामोदर तुले जा लागनं तालुक्याले.

दामोदरनं होकार भरला. रांधन घरात गेला. बकूळेनं भाकरी थापल्या, तुरीच्या चिपळाच्या गोयाची भाजी केली दोघही पोटभर जेवले आणि झोपी गेले. बकुळा पायटच्या पाचच्या अजानला ऊठली. तीने सडा सारवन, आंघोळ केली, तुळ-शीला पाणी वाहलं, दिवाबत्ती केली, देव न्हानले, चहा बनवून नवऱ्याला दिला. भाकरी थापल्या. न्याहारी दिली. संध्याकाय होईल म्हणून शिदोरी बांधूनं दिली. दामोदरनं जायची तयारी केली. जाताना बकूळेच्या गालाचे चुंबन घेतले. बकुळा दामोदरची पाठमोरी मूर्ती बघत अंगणात ऊभी होती. दामोदरने मागे वळून पाहिले तर बकूळा त्यालाच न्याहाळत होती. भैरवची बायको सग्यासयऱ्याच्या लगनाले गेली होती. भैरवनं साऱ्या सालगड्यांना रजा दिली होती. फक्त एकच विश्वासातला माणूस बापूराव हा भैरव पाटलाच्या दिमतीला वाड्यावर होता. भैरव बापूरावला बोलला. बापू एक काम कर गळ्या माह्यं. सरकारचा हुकूम सर ऑखोपर. बोला सरकार काय करू. दामोदरच्या घरी जाय अन् त्याच्या बायकोले बलावूनं आनं. काय निरोप देवू सरकार. कायच्यासाठी बलावलं म्हनून. अरे भैताळ्या. त्वाली लक्ष्मीबाई वैनीसाहेब लगनाले गेल्या ना मंग मले भाकर टुकळा कोन करनं.

माह्या घरूनं आनतो ना सरकार. गावरानं कोंबळ अन् जवारीच्या पाच सहा भाकरी . थो दामोदर मटन खात नाही ना त्याची बायको खात. मंग तीले कस बनवता येईनं मटन. थ्या परीस माह्या बायकोले आनतो सरकार. अरे! भैताळ बेलन्या तुले जे सांगल थे करनं. काहाले फुकटचे ऊंखंडे फुकत. भैरव रागारागात बोलला. बर सरकार तुम्ही म्हसान तस करतो. बापूरावनं खजील होवूनं मान डोलावली. अन काठी घेऊन तडक तो दामोदरच्या घरी आला. काठीनं दार वाजवलं. बकूळाला वाटले तीचा नवराच आला. ती हरकलि अन आनंदाने धावत येऊन तीने दार खोलले. तीचा चेहरा बापूराव दारात ऊभा पाहताच बकूळाचा चेहरा पडला. बकूळा नाराज होवूनं बापूरावला म्हणाली.



भावजी या ना घरात. बकूळेनं जल्मरीच्या ग्लासात पाणी दिल. चुलीवर चा ठुयला. बापूराव चा पिला. बकूळा बापूरावच्या पुढे पाय दुमडून बसली. भावजी अजूनं हे आले नाही. कवा येतीनं. पायटी येयन दामोदर. तालुक्याले गेल्यावर टायम लागनारचं. अव मायबाई हे त म्हनत होते. सयसंध्याकाय लोग येयन म्हनूनसन्या. बरं थे जावूद्या कस काय येनं केलं ईकळे. वयनी तुम्हाले भैरव पाटील सरकारनं वाड्यावर बलावलं. बकूळा भैरवच नाव ऐकताच भांबावली, घाबरली, टरकली...आणी तीची छाती ढोल बदळावा तशी बदडल्या जात होती. डोळ्यात भिती दाटून आली होते. जिभीला लकवा पडल्यागत बोलली. का...हा... ले..ब..लावल.. सैपाकाले. कामून तेयची बायको कुठ गेली पासली पळाले. थ्या वैनीसाहेब गेल्या सोयऱ्याच्या लगनाले. बाबूळगावले..चला पटकन तेयले भूक लागली असनं. बकुळाचे अंग नी अंग थरथर हरिणवानी कापत होतं. आता काय करावं. गेली त अब्रू जाते अन नाही गेली त नवऱ्याच काम. तिने काही वेळ विचार करत ऊठली. चांगभांग केला. घोयात ईवा टाकला. अन् निंघाली बापूरावच्या मागे मागे.भैरव त्याच्या वाड्याच्या खिडकीतून बकूळेची चातका सारखी वाट बघत होता. त्याला दुरूनचं बकूळा दिसली आणी तो अंगोपांगी शहारला, मोहरला, प्रफुल्लित झाला. त्याच्या चेह-यावर चांदील दाटली. बापूरावने बकूळेला रांधन घर दाखवल, पिठ, मीठ, तिखटाचे गाडगे दाखवले. बकूळेने विजेच्या गतीने सैपाक केला. हात धुतला आणि बापूरावला जाता जाता म्हणाली...भावजी जातो म्या घरी. दवळीत भाकरी बनवून ठेवल्या अन दवळी शिक्यावर ठुयली हायं. आलूवांग्याची भाजी गंजात शिजवून ठुयली. जातो मंग मी आता. अस बोलत बकूळा आनंदीत होवून वाड्याबाहेर पावल टाकत चालली होती. हरनाने वाघाच्या तावडीतूनं सुटाव तस तीला वाटत होते. तीचे पावल मोठमोठे नी भरभर पडत होती. तीला आनंद अपार झाला होता. तेवढ्यात भैरवचा आवाज दुमदुमला...बकुळे थांब. बकुळाच्या आनंदावर विरजन पडलं.

तिचे पाय थबकले, पोटऱ्यात कंप भरला. काळजात जी मघाशी तसार वाजत होती तीच रूप ढोलानं घेतलं होतं. तीने डोक्यावर पदर घेत म्हतलं. काय सरकार? खिचळी बनव अन हे कोंबड आनल थ्याले छिलूनं साजरी भाजी बनव मले आवळते. बापू तेवढ्यात खेकरत बोल्ला सरकार तीले कोंबड कापता येत नाही ना शिजवता येत. माह्या घरूनं आनू काय बनवूनं. नाही बापू मले अथिसाच बनवून पाह्यजे. असा दरडावत फनकाऱ्यानं भैरव बोलला. वैनी कायजी करू नोका मी बात देतो कोंबड कापून. तुम्ही तुरीची दाय टाका चुल्यावर शिजाले. बकूळेनं चुलीवर पानी ठेवलं. तुरीची दाळ निसली. आंदन आल्यावर दाळ टाकली. गदका आल्यावर तांदूळ निसूनं टाकले. खिचडी चुलीवरची ऊल्ह्यावर आली. बापूनं कोंबड्याचं मानगुट धरलं चर्रकन सुरीनं मुंडक धळा वेगळं केलं. कोंबड फडफडत थंड झाल. अंगावरचे पंख ओरबाडून काढण्यात आले. खरपावर सुरा पाजवण्यात आला. लाकडाच्या गोल बुंद्यावर कोंबड्याचे तुकडे करण्यात आले. गरम पान्याने धुवूनं हयद मिठाच्या पान्यात भगून्यात सोडण्यात आले. कोंबड शिजलं. तिखट, मिठ, आरात भाजलेला कांदा नी खोबर मसाल्याची फोडणी देण्यात आली. भाजी तयार झाली. बकुळा आता पुन्हा हरकली. बापूराव बकूळाला बोलला.

वैनी जा आता घरी. लय रात झाली. मी येवू काय सोळाले घरी. नाही नाही भावजी मी जातो एकली. आपलच गाव हाय. काहाच भेव हाय.जातो एकलीचं. कुतरे गीतरे पायजा देसान अंधारात पाय. बराबर जा. बापूराव लय साजरा माणूस आहे. आपल्याला खुप मदत केली. धनी दामोदररावचा खरा मैतर हाय. अडीअडचणीले, सुख-दुखात धावूनं येतो. असं मनात म्हनत चाल्ली. तेव्हाच वाघाने डरकाडी फोडाव तसा भैरव पुन्हा ओरडला. बकुळे!...सैपाक केला खरी... पन वाहळून कोन देईन. बकुळा आता घायबरली. भैरवच्या मनात कायबेर हाय. हे तिनं हेरलं. हा डाव साधन्याचा प्रयत्न करेल. पन ह्या आडदंड मानसापुळे माह्यासारख्या पिटूकल्या बाईचा टिकाव लागन काय? ह्या ईचारात ती गुंग झाली होती. बकूळा डबलूनं रांधन घरात आली. तीला तो वाडा नकोसा झाला होता. चौभवताल तीने नजर फिरवली. वाडा चिरेबंदी, मजबूत दार. वाड्याची फिताळ आ वासून ऊभी दिसत होती. तिने तासकी घेतली वाढायला सुरवात केली. तितक्यात भैरव दरडावला. बापू मले मोहाची दारू तांब्याभर घेवून ये बर पंचायाकळूनं. बापून लोटा घेतला अन् निंघाला. आता बकूळेचा थ्या चिरेबंदी वाळ्यातला एकमेव सहारा थो ही निघून गेला होता. बकूळा थरथरत होती. वाळ्यात तिचा जीव घुटम ळत होता. भैरव बकुळाजवळ आला. बकुळे माह्य एक काम करशीन काय? कोन्च सरकार. बकुळाचे ओठ थरथरत होते. अंगाला थंडीसारख कापर भरलं होतं.

आजच्या राती माह्यी होशीन काय? तुले लागन थे देतो..फकस्त...बकुळानं डाव ओयखला. मटनाची तासकी भैरवच्या तोंडावर क्षणात भिरकावली. भैरव मटनान माखला. तो आता पिसायल्या कुत्र्यावानी झाला होता. त्यान अंदरून दाराचा कोंडा लावला, कुलूप बंद करून जोरजोरात राकेसा सारखा हसायला लागला. बकूळा मलूल झाली. ती भैरव ला दयायाचना करत होती. सरकार अस नोका करू. तुम्ही अस करसान त मी तोंड दाखवाच्या लायकीची ना राह्यनं. मले एकत मरा लागन नाही त मारा लागनं.

असं म्हनत तिने घोयात असलेला ईया काढूनं वार केला. पण त्याने वार हुकवत तीचा हात धरलं जवळ ओढल. तीच्या गळ्यावरूनं हात फिरवाले लागला. ती भैरवला ईज्जतीची भीक मागत होती. पण तो ऐकत नव्हता. तो आता मनसुबा पुरा करनार तितक्यात बापू आला. बकूळाचा आवाज दाराच्या आडून ऐकत होता. त्याने क्षणाचाही विलंब न करता एका लाथेत दार पाडलं आणि कंबरेची पाजवलेली कु-हाड भैरवच्या मस्तकात हानली. एका फटक्यात भैरवची कवटी फुटली. रक्तबंबाळ होऊन भैरव निपचित पडला. बकुळा घाबरली. आता काही खर नाही भावजी आपलं. आपल्याले फाशी जा लागनं.

भेदरलेल्या स्वरात बकुळा बोलली. वयनी कायजी करू नोका. मी सार ठिक करतो. तुम्ही घाबरू नोका. हे गोठ कानोकान कोनाले मालूम नाही झाली पाह्यजे दामोदरले ही नाही. बकुळेनं मान हालवली अन थे भयभीत होत घरच्या दिशेनं निघाली. बापू ताळकन ऊठला. संग दोन पोते घेवूनं जंगलात गेला. दोन कोल्हे त्याने पोत्यात पकडून वाड्यात आणले. ज्या खोलीत भैरवले मारलं थ्या खोलीत दोन्ही कोल्हे सोडले. दार बाहेरून लावलं. पोते जाळून टाकले, कु-हाड विहरीत टाकली.अन् रातभर दाराच्या बाहेर पहारा करून थो ऊभा होता. दाराच्या फटीतून त्याने आत पाहले तर दोन्ही कोल्हे भैरवचा लचका तोडत होते. पहाट होताच बापूने खोटीनाटी बोंब ठोकली. धाकट्या सरकारले कोल्ह्यान मारलं, फाडलं, खाल्ल. अवघ गाव जमा झालं. सार गाव पाहत होत की, कोल्हे भैरवला खात आहेत. बकुळा मात्र अंगावर वाकळ घेऊनं भयभीत होऊन रडत होती. दिस, मास, साल लोटल अन् सार काही आलबेल झालं. असा हा बापूराव दामोदरचा खरा मित्र होता.

**– सु. पुं. अढाऊकर**
अकोला.
मो. ९७६९२०२५९७

---

## अक्षरगोदा

# वाचन संस्कृतीचे ऱ्हासपर्व सांगणारा उपरोधिक स्वर!

**सु. मा. कुलकर्णी,** नांदेड

वाचू नका, पुस्तक बिस्तक!
---



कामातूनच जाईल मस्तक
वाचू नका पुस्तक बिस्तक
वाचून वाचून चष्मा लागेल सोडावॉटर
मग कसला शेक्सपिअर
आणि कसला हॅरी पॉटर!
राष्ट्रभक्त सर्कशीत व्हेटर्नरी मास्टररींग
कसलं काय बिलॉगिंग नि कसलं हाय फिलांगिंग !
बुकलवर बिकलवर शक्यतो होऊ नका
भिकारपणाचे हे धंदे, त्यात लक्ष देऊ नका
आजतागायत एक तरी शाणा कोण
झालाय काय पुस्तक वाचून ?
वर्षामागून वर्षे गेली
जात -धर्म - तसेच साचून --
म्हणून म्हणतो, पुस्तक फक्त
किलोवरची रद्दी
असते
'शायनांग' प्रवक्त्यांची चार दिवस सद्दी असते.
किती जरी वाचली तुम्ही पानांमागून पाने
कुणीतरी विचारतोर्चे पण कोण गुरुजी साने?
आणि कोण पां. वा काणे?
'श्यामच्या आई' शिवाय कुणाचे काही अडत नाही
पुस्तक वाचलं नाही म्हणून
आमदार खासदार पडत नाही
पुस्तक वाचणे म्हणजे सांगतो,
फक्त रिकामटेकडा धंदा
दरमहा पगार चोख,
वाचले जरी नाहीत 'विंदा '
अटक मटक चवळी चटक
वाचू नका पुस्तक बिस्तक
डोकं नसलं तरी खोकं
एकदम पायजे चकाचक!
आणखी एक दोन वर्षात
बघा
पुस्तकफाडू हिरो होतील
फेसबुकवरच्या फेसामध्ये
लेखक -बिखक बुडत
जातील
समीक्षक बिमीक्षक
मुरडतील नाके खूप
काय माहीत, छापील बिपील
हळुहळू होईल चूप ?
---

ठाणे येथील प्रख्यात साहित्यिक, कवी महेश केळुसकर यांची १८ नोव्हेंबर २०२६ ही ताजी रचना आजच्या 'अक्षरगोदा' सदरासाठी मी निवडली आहे. फेसबुक सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि मालिकांची दुनिया यांच्या नादात वाचन संस्कृतीचे ऱ्हासपर्व सुरू झालेले असताना त्यावर उपरोधिक भाष्य करणारी कवींचा उपरोधक स्वर आपल्या सगळ्यांच्याच डोळ्यांत अंजन घालणारा आहे.

वेगळ्या शब्दात सांगायचे तर

महेश केळुसकर यांची 'वाचू नका पुस्तक बिस्तक' ही कविता आजच्या गतिमान, व्यावहारिक आणि काहीशा उपहासात्मक वास्तवावर बोट ठेवणारी एक धारदार, खोचक आणि विचार करायला लावणारी रचना आहे.

ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज देखील एका प्रवचनात म्हणतात, 'ग्रंथ वाचन खूप झाले, आता गुरूला शरण जा तोच गती सद्गती देईल. तसा कुठला आध्यात्मिक स्वर या कवितेत नाही. सगळं रोखठोक आहे. वरवर पाहता ही कविता वाचनाविरोधात बोलत असली, तरी तिचा खरा रोख हा 'वाचन संस्कृतीचा ऱ्हास', 'व्यावहारिक जगातील विसंगती' आणि 'बौद्धिक खोकेबाजी' यांकडे आहे.

**कवितेचा गाभा आणि 'उलटा अर्थ'**

कवितेची सुरुवातच कामातूनच जाईल मस्तक/वाचू नका पुस्तक बिस्तक या धक्कादायक आणि खेळकर ओळीने होते. हा उपरोधिक स्वर स्पष्ट होतो. 'पुस्तक बिस्तक' किंवा 'शेक्सपिअर आणि हॅरी पॉटर' असे शब्द वापरून कवीने वाचनाकडे पाहण्याचा एक हलकाफुलका, पण खोचक दृष्टिकोन मांडला आहे.

वाचून वाचून चष्मा लागेल सोडावॉटर यासारख्या प्रतिम ांतून शारीरिक त्रासाची भीती दाखवून वाचनापासून दूर राहण्याचा 'सल्ला' दिला जातो, पण हा सल्ला प्रत्यक्षात आजच्या पिढीतील वाचनाप्रती असलेल्या उदासीनतेवर केलेला तीक्ष्ण उपहास आहे!

**व्यवस्थेतील विसंगतीवर बोट**

**कवी समाजातील एक कटू सत्य मांडतो:**

पुस्तक वाचलं नाही म्हणून आमदार खासदार पडत नाही आणि दरमहा पगार चोख, वाचले जरी नाहीत 'विंदा' या ओळींतून यश, सत्ता आणि आर्थिक स्थैर्य मिळवण्यासाठी वाचन किंवा साहित्याची जाण असणे हे आजच्या व्यवस्थेत निकष राहिलेले नाहीत, हे स्पष्ट होते.

साने गुरुजी, पां. वा. काणे किंवा विंदा करंदीकर यांसारख्या महान साहित्यिक-विचारवंतांची नावे घेऊन कवीने 'खऱ्या ज्ञानाचा' संदर्भ दिला आहे; पण आजच्या जगात या नावांची ओळख नसतानाही व्यवहार कसे चालतात, याचे विदारक चित्र यातून उभे राहते.

**डिजिटल युग आणि 'खोकं' संस्कृती**

कवितेच्या शेवटच्या कडव्यात कवी वर्तमान आणि भविष्याकडे पाहतो: डोकं नसलं तरी खोकं/एकदम पायजे चकाचक! येथे 'डोकं' म्हणजे विचारशक्ती किंवा समज आणि 'खोकं' म्हणजे पैसा/संपत्ती किंवा वरवरचा दिखावा. विचारांपेक्षा 'खोक्याला' मिळणारे महत्त्व कवीने नेमकेपणाने टिपले आहे. वाचन नाही, पुस्तक प्रेम नाही, मूल्यहीन जगण्याचा प्रत्यय आपल्याला राजकारणात बघायला मिळाला आहे. पक्षनिष्ठा, तत्त्वनिष्ठा राजकारण ही मूल्ये पायदळी तुडवून खोके जवळ करणारे राजकारणी नेते आपण बघितले आहेत.

पुस्तकफाडू हिरो, फेसबुकवरच्या फेसामध्ये आणि छापील-बिपील हळूहळू होईल चूप या ओळींतून सोशल मीडियाचा प्रभाव, छापील पुस्तकांचे भवितव्य आणि समीक्षक-लेखकांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

**भाषिक शैली आणि रचनेचे वैशिष्ट्ये**

उपहासात्मक आणि लयबद्ध भाषा: 'पुस्तक बिस्तक', 'लेखक-बिखक', 'समीक्षक बिमीक्षक', 'छापील बिपील' अशी यमक जुळणारी, बोलीभाषेचा लहेजा असलेली शब्दकळा कवितेला एक वेगळीच खुमारी आणि धार देते.

बालगीताचा पेहराव अटक मटक चवळी चटक या ओळीनंतर येणारा गंभीर-उपहासात्मक आशय, खेळकरपणा आणि गंभीर वास्तव यांची अनोखी सांगड घालतो. एकंदरीत, महेश केळुसकर यांची ही कविता 'वाचू नका' असे म्हणत असली, तरी ती वाचनाचे महत्त्व आणि त्यातील पोकळी अत्यंत गमतीशीर पण तितक्याच मार्मिक पद्धतीने अधोरेखित करते. हसता हसता विचार करायला लावणारी, आजच्या काळाचा आरसा दाखवणारी ही एक प्रभावी उपहासात्मक रचना आहे.

१. मर्ढेकरांची कविता आणि केळुसकरांची कविता: 'नागर घुसमट' विरुद्ध 'सांस्कृतिक-व्यावहारिक उपहास' मर्ढेकरांच्या 'पिपांत मेले उंदीर' किंवा 'संध्याकाळच्या कविता' (उदा. संध्याकाळी या झाडांवर... अथवा देवाचं मंदीर कोसळलं...) या रचनेशी केळुसकरांच्या कवितेची तुलना केल्यास काळाच्या ओघात बदललेले 'दुःख' आणि 'व्यंग' स्पष्ट होते.

**कवितेचा मूळ सूर:** मर्ढेकरांच्या कवितेत दुसऱ्या महायुद्धानंतरची अस्तित्ववादी निराशा, यांत्रिकता आणि माणसाची अगतिकता आहे. 'पिपांत मेले उंदीर' सारख्या प्रतिमेतून व्यवस्था आणि मानवी जीवनातील व्यर्थता धक्कादायकरीत्या समोर येते. याउलट, केळुसकरांच्या कवितेत अगतिक रडगाणे नसून खोचक उपहास, शहरी-डिजिटल वास्तवातील विडंबन आणि 'डोकं नसलं तरी खोकं' यासारखा तिखट टोमणा आहे.

**भाषेचा वापर:** मर्ढेकरांनी पारंपरिक काव्यसंकेत मोडून 'पिंप', 'उंदीर', 'गटार' यांसारख्या शहरी-व्यावहारिक प्रतिमांचा वापर करून कवितेला धक्का दिला. केळुसकर त्याच वाटेवर पुढे जात 'पुस्तक बिस्तक', 'लेखक बिखक', 'छापील बिपील' यांसारखी अनुप्रासिक, उपहासात्मक आणि सोशल मीडियाच्या काळातील बोलीभाषा वापरतात. मर्ढेकरांचा धक्का अस्वस्थ करणारा आहे, तर केळुसकरांचा धक्का हसवता-हसवता अंतर्मुख करणारा आहे.

२. विंदा करंदीकरांची कविता आणि केळुसकरांची कविता अशी तुलना अप्रस्तुत असली तरी 'क्रांती-विद्रोहाची तडफ' विरुद्ध 'सत्ता-व्यवस्थेची चिरफाड' असा पट इथे उलगडत जातो.

विंदा करंदीकरांच्या 'अष्टदर्शने' किंवा त्यांच्या बंडखोर-विद्रोही कवितांशी (उदा. 'स्वतःशीच', 'राणीची बाग' किंवा 'भ्रष्टाचार' यांसारख्या सामाजिक-राजकीय भाष्य करणाऱ्या कविता) केळुसकरांची कविता तुलनेला उभी राहू शकते.

**सामाजिक-राजकीय भान:** विंदांच्या कवितेत अन्याय, शोषण आणि व्यवस्थेविरुद्धचा तीव्र विद्रोह, वैचारिक खळबळ आणि मानवी मुक्तीची आस दिसते. केळुसकरांच्या कवितेत पुस्तक वाचलं नाही म्हणून आमदार खासदार पडत नाही किंवा दरमहा पगार चोख, वाचले जरी नाहीत 'विंदा' या ओळींतून त्याच व्यवस्थेतील बौद्धिक-सांस्कृतिक उदासीनतेवर बोट ठेवले जाते. विशेष म्हणजे, केळुसकर स्वतः विंदांचे नाव घेऊन आजच्या काळातील वाचन-संस्कृतीची उणीव अधोरेखित करतात!

**लयीचा आणि शैलीचा खेळ:** विंदांची भाषा कधी अत्यंत नाट्यमय, लयबद्ध आणि भेदक असते, तर कधी बालकवितेसारखी खेळकर पण खोल अर्थ दडवणारी असते. केळुसकर अटक मटक चवळी चटक या बालगीताच्या लयीचा आधार घेऊन गंभीर सांस्कृतिक प्रश्न मांडतात. हा लयीतील खेळ कवितेला एक वेगळीच धार देतो.

मर्ढेकर आणि विंदा यांनी मराठी कवितेला आधुनिकतेची आणि नवतेची भक्कम जमीन दिली. त्याच जमिनीवर उभी राहून महेश केळुसकर यांची कविता आजच्या काळातील 'वाचन-विन्मुखता' आणि 'बौद्धिक पोकळी' यांवर उपहासाचा प्रकाश टाकते. त्यामुळे ही तुलना केवळ दोन पिढ्यांची नाही, तर मराठी कवितेने काळानुसार बदललेली रूपे समजून घेण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

---

# माणूसपण जपा...

माणसाचं आयुष्य म्हणजे सुख-दुःखाचा, चढ-उताराचा आणि अनुभवांचा प्रवास आहे. या प्रवासात नोकरीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. नोकरी लागली की, माणसाच्या आयुष्याला एक शिस्त लागते. रोज सकाळी उठायचं, तयारी करायची, ऑफिस गाठायचं, साहेबांचे आदेश पाळायचे, सहकाऱ्यांसोबत काम करायचं, जबाबदाऱ्या पार पाडायच्या. असं हे धावपळीचं जीवन सुरू राहते. पण एक गोष्ट कायम लक्षात ठेवावी, नोकरी ही आयुष्याचा एक भाग आहे, पूर्ण आयुष्य नाही.

नोकरी करताना आणि सेवानिवृत्त झाल्यानंतरही आपल्यातलं माणूसपण जपणं फार गरजेचं आहे. ऑफिसमध्ये काम करत असताना माणसाला मोठा रुबाब असतो. टेबल, खुर्ची, केबिन, हाताखाली काम करणारी माणसं, रोजचा मान-सन्मान, फोनची रिंग आणि कामाचा व्याप या कामात दिवस कसा निघून जातो, हे कळतसुद्धा नाही. कधी आपण साहेब असतो, तर कधी कुणाच्या हाताखाली काम करणारे असतो. आपल्या एका सहीला किंमत असते, आपल्या शब्दाला वजन असतं. काही माणसं आपल्या भोवती गोळा होतात. आपलं काम करून घेण्यासाठी अनेकजण आपल्याला मान देतात. पण काळाचं चाक कधी थांबत नसत. आज आपण खुर्चीवर बसलेलो असतो, उद्या त्याच खुर्चीवर दुसरं कुणीतरी बसलेलं असतं. म्हणून नोकरीत असतानाच माणसाने माणसाशी माणसासारखे वागायला शिकलं पाहिजे.

सेवानिवृत्तीचा दिवस उजाडतो. शेवटचा दिवस ऑफिसमध्ये जातो. सहकारी निरोप समारंभ घेतात. हार, फेटा, शाल, श्रीफळ देऊन सत्कार करतात. भाषणं होतात, आठवणी सांगितल्या जातात. डोळ्यांत पाणी येतं. सगळे म्हणतात, तुमची उणीव आम्हाला नेहमी जाणवेल. पण दुसऱ्या दिवसा-पासून चित्र बदलायला लागतं. ना ऑफिसची घाई, ना फोनची वर्दळ, ना साहेब म्हणून हाक मारणारे लोक, ना रोजची धावपळ कालपर्यंत त्यांच्याभोवती माणसाचा गराडा होता, त्यांच्याभोवती आता शांतता असते. कालपर्यंत त्यांच्या सहीशिवाय फाईल पुढं सरकत नव्हती, आज त्यांचीच फाईल कपाटात पडून असते. कालपर्यंत त्यांना भेटायला लोक वेळ मागत होते, आज त्यांना भेटायला लोकांकडे वेळ नसतो. हे वास्तव प्रत्येकाने समजून घ्यायला पाहिजे.

म्हणूनच नोकरीत असताना कुणाचा अपमान करू नका. आपल्या पदाचा, अधिकाराचा आणि खुर्चीचा गर्व करू नका. आपल्यापेक्षा खालच्या पदावर काम करणाऱ्या माणसालाही आदर द्या. शिपाई असो, सफाई कामगार असो, क्लार्क असो किंवा अधिकारी असो, प्रत्येकाच्या घाम ाला आणि कष्टाला किंमत असते. कारण पद, खुर्च्या, अधिकार कायम राहत नाहीत; पण आपण माणसांच्या मनात निर्माण केलेली जागा कायम राहू शकते. सेवानिवृत्तीनंतरही आयुष्य संपत नाही. उलट स्वतःसाठी, कुटुंबासाठी, नातवंडांसाठी, मित्रांसाठी आणि समाजासाठी जगण्याची नवी संधी मिळते. शेतीकडे लक्ष द्या, गावातल्या लोकांमध्ये मिसळा, जुन्या मित्रांना भेटा, सामाजिक कामात भाग घ्या. आपला अनुभव नव्या पिढीला सांगा.

नोकरीच्या काळात आपण किती लोकांवर हुकूम गाजवला, यापेक्षा सेवानिवृत्तीनंतर किती लोक आपल्याला प्रेमानं भेटायला येतात, हे महत्त्वाचं असतं. शेवटी एवढंच सांगावंसं वाटतं की, आयुष्यभर नोकरी करा, प्रामाणिकपणे काम करा, मोठं पद मिळवा, भरपूर नाव कमवा; पण या सगळ्याच्या नादात माणूसपण हरवू देऊ नका. आज तुमच्या टेबलासमोर लोक उभे असतील, उद्या तुम्हालाही दुसऱ्याच्या दारात जावं लागेल. आज तुम्ही कुणाला मदत करू शकता, उद्या तुम्हालाही कुणाच्या मदतीची गरज पडू शकते. म्हणून माणसाला माणूस म्हणून ओळखा. पद बघून मान देऊ नका, तर माणुसकी बघून मान द्या. कारण नोकरी संपते, अधिकार संपतो, खुर्ची बदलते; पण माणसाने माणसाच्या मनात निर्माण केलेला आदर कधीच सेवानिवृत्त होत नसतो पदाचा मान काही दिवसांचा, पण माणुसकीचा मान जन्मभराचा म्हणून पद मोठं असण्यापेक्षा मन मोठं ठेवा आणि आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर माणूसपण जपा.

**–श्रीकांत संभाजी मगर**
नांदेड.
मो. ९६८९११७१६९

## नुसताच पोकळ डोलारा नसावा

नुसताच शब्दांचा पाऊस नसावा,
शब्दांना अर्थाचा गंध असावा,
देहाला कॉस्मेटिक चा लेप नसावा,
देह आतून सुंदर असावा.
नुसताच माणूस दिसण्याला नसावा,
असण्याचा त्यात अधिवास असावा,
जगणे नसावे नुसतेच स्वप्न,
त्यात अथक प्रयत्नांचा हात असावा.
नुसताच बाजार भावनेचा नसावा,
बुद्धीचाही सिंहाचा वाटा असावा,
जगणे नसावे नुसताच भास,
वास्तवाचा मोकळा श्वास असावा.
नुसताच स्वार्थाचा अंधार नसावा,
जगणे असा दिवा बनावा,
प्रकाश त्याच्या परोपकाराचा,
दुसऱ्याच्याही अंगणात पडावा.

**–प्रा. अमित शिंदे**
नांदेड
मो. ९७६७८५१०४६.

# राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य रवी रामू कलोसे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेत बैठक संपन्न

- महानगरपालिका सफाई कर्मचाऱ्यांच्या स्थितीचा घेतला आढावा
- सफाई कामागारांचे प्रश्न सोडविण्यासाठी समन्वय समितीची होणार स्थापना



**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य सध्या नांदेड दौऱ्यावर असून, आयोगाचे सदस्य रवी रामू कलोसे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्यालयात दिनांक २० नोव्हेंबर २०२६ रोजी बैठक पार पडली. या बैठकीत नांदेड महानगरपालिकेतील कार्यरत असलेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या सद्यस्थितीचा आढावा आयोगाच्या सदस्यांनी घेतला.

या बैठकीस मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त अभिजित वायकोस, उपायुक्त नितीन गाढवे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे, मुख्य लेखापरीक्ष आनंद ऐनवाड, शहर अभियंता सुमंत पाटील, कार्यकारी अभियंता संघरत्न सोनसळे, सहाय्यक आयुक्त मो.गुलाम सादेक, सहाय्यक आयुक्त रावण सोनसळे, सफाई कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी तसेच जिल्ह्यातील इतर कार्यालयांच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम राष्ट्रीय कर्मचारी आयोगाचे सदस्य रवी रामू कलोसे यांचे मनपा आयुक्तांच्या हस्ते स्वागत करुन बैठकीस सुरुवात करण्यात आली. बैठकीच्या प्रारंभी उपआयुक्त नितीन गाढवे यांनी महानगरपालिकेतील कार्यरत सफाई कर्मचाऱ्यांच्या संदर्भात सादरीकरण केले. ज्यामध्ये महानगरपालिका क्षेत्रात एकूण ६ झोन असून, त्यातील २० प्रभागांमध्ये संपूर्ण शहराच्या साफ-सफाईची कामे कायम व कंत्राटदारामार्फत नेमलेल्या सफाई कामगारांमार्फत करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधानुसार सफाई कामगारांची एकूण मंजूर पदसंख्या ८०५ असून त्यापैकी आजमितीस ५१८ कायम कामगार कार्यरत आहेत तर २८७ कायम सफाई कागारांची पदे रिक्त आहेत. त्याचप्रमाणे कंत्राटदारामार्फत एकूण ३२० सफाई कर्मचारी कार्यरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. अमृत २.० योजने अंतर्गत शहरात मलनिस्सारण जोडणीचे प्रमाण ९८% असून, नांदेड शहरात Insanitary latrines नसल्याचे नमूद करण्यात आले. त्याचप्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत एकूण २३ सार्वजनिक शौचालय कार्यरत असून सर्व शौचालय बी.ओ.टी. तत्वावर दिलेले आहेत. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत हागणदारीमुक्त शहर उपक्रमात शहरातील ४३८८ पात्र लाभार्थींना वैयक्तिक शौचालय बांधून देण्यात आल्याची माहिती यावेळी पालिकेमार्फत देण्यात आली.

पालिका हद्दीमध्ये हाताने मैला साफ करणाऱ्या कामगारांची सद्यस्थिती जाणून घेताना महापालिके मार्फत सन १९९७ पासून जेटींग मशिनव्दारे साफसफाईचे काम केले जात होते. तसेच सद्य:स्थितीत जेटींग व गल्फर मशिनव्दारे साफसफाई केली जात असल्यामुळे शहरात हाताने मैला उचलला जात नसल्याचे पालिकेमार्फत नमूद करण्यात आले. परंतु यथास्थिती एखाद्या कामगाराने सदरील काम करीत असल्याबाबत स्वयंघोषित केल्यानंतर त्याची माहिती जिल्हा मॅन्युअल स्कैवेजिंग कमिटीकडे सादर करणे बंधनकारक असल्याचे आयोगाच्या सदस्यांनी स्पष्ट केले. तसेच समाज कल्याण विभागातील उपस्थित अधिकाऱ्यास जिल्हा मॅन्युअल स्कैवेजिंग समितीची स्थापणा करण्याबाबत निर्देश दिले. त्याचप्रमाणे हाताने मैला साफ करणाऱ्या कामागारांच्या पुनर्वसनासाठी शासनाने निश्चित केलेल्या योजनांचा मोठ्या प्रमाणावर प्रचार व प्रसार करावा अशी सुचना यावेळी आयोगाच्या सदस्यांनी केली. या प्रतिबंधित नियमांच्या अनुषंगाने सफाई कामगारांना अत्याधुनिक यंत्रसामुग्री हाताळणीसाठी वेळोवेळी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्याबाबत सुचित करण्यात आले.

# हदगाव मतदारसंघातील वीजपुरवठ्याच्या समस्या प्राधान्याने सोडवा -राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

नवीन उपकेंद्रे, रोहित्रांची क्षमता वाढविणे आणि वीज वितरण यंत्रणेच्या कामांना गती देण्याचे निर्देश

**मुंबई/नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यातील हदगाव विधानसभा मतदार संघातील वीजपुरवठ्याशी संबंधित प्रलंबित प्रश्न प्राधान्याने सोडवावेत. तसेच नवीन वीज उपकेंद्रांची उभारणी, रोहित्रांची क्षमता वाढविणे आणि वीज वितरण यंत्रणेचे सक्षमीकरण याबाबत आवश्यक कार्यवाही तातडीने करावी, असे निर्देश ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले.

हदगाव मतदार संघातील ऊर्जा विभागाच्या प्रलंबित प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी मतदारसंघातील कमी दाबाने होणारा वीजपुरवठा, लांब अंतरावरील उपकेंद्रांमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी आणि नवीन उपकेंद्रांची आवश्यकता याबाबत मागण्या मांडल्या.

मतदारसंघातील मानवाडी येथे १३२ केव्ही उपकेंद्र उभारण्याच्या प्रस्तावाचा पाठपुरावा करावा. तसेच लोहा, मुदखेड आणि इतर प्रस्तावित उपकेंद्रांच्या कामांची सद्यस्थिती तपासून आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले.

निवघा बाजार, रावणगाव, रुई, बेलमंडळ आणि चाफळा येथील उपकेंद्रांच्या प्रस्तावांसह अतिरिक्त रोहित्रांची आवश्यकता, वीजवाहिन्यांचे काम आणि शेतीपंपांना सुरळीत वीजपुरवठा या विषयांचाही आढावा घेण्यात आला. प्रलंबित प्रस्तावांची पुनर्तपासणी करून आवश्यक कामांचा समावेश आगामी नियोजनात करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

हिमायतनगर परिसरात ५ एमव्हीए क्षमतेचे रोहित्र कार्यान्वित करण्यात आले असून, तळणी येथेही रोहित्र सुरू करण्यात आले आहे. उर्वरित प्रस्तावित कामांची तांत्रिक व्यवहार्यता तपासून ती मार्गी लावण्याबाबत चर्चा झाली. तसेच आवश्यकतेनुसार कंत्राटी मनुष्यबळ आणि काम करणाऱ्या एजन्सींची संख्या वाढविणे, स्थानिक पातळीवर मनुष्यबळ उपलब्ध करणे आणि मंजूर कामांची अंमलबजावणी जलदगतीने करणे यावरही बैठकीत भर देण्यात आला.

यावेळी महावितरणचे कार्यकारी संचालक चंद्रमणी मिश्रा, कार्यकारी संचालक (वितरण) अंकुर कवळे, कार्यकारी संचालक सुनील काकडे, कार्यकारी संचालक भुजंग खंडारे, अधीक्षक अभियंता (वितरण) नितीन काळे, अधीक्षक अभियंता संजय खंडारे आदी उपस्थित होते.

## ज्येष्ठ साहित्यिक एल. के. कुलकर्णी दाम्पत्याचा आज सत्कार



**नांदेड (प्रतिनिधी)–** संस्कार भारती नांदेड समितीच्या वतीने रविवार, दि. २२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता 'सन्मान साहित्य रत्नांचा' या विशेष सत्कार व संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नांदेडचे साहित्यभूषण, सुविख्यात साहित्यिक व खगोल विज्ञान तज्ज्ञ एल. के. कुलकर्णी यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त अभीष्टचिंतन आणि त्यांच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'लोकमाता गोदावरी समग्र दर्शन' या ग्रंथाच्या निमित्ताने एल. के. कुलकर्णी व त्यांच्या सुविद्य पत्नी चंद्रकला कुलकर्णी या लेखक दाम्पत्याचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम डॉ. प्रमोद देशपांडे यांचे निवासस्थान, शारदा संगीत विद्यालय, १०७ प्रेमनगर, जैन मंदिराजवळ, मालेगाव रोड, तरोडा खुर्द, नांदेड येथे संपन्न होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड मर्चंट्स बँकेचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण संगेवार हे राहणार आहेत.

# आसना गार्डनमध्ये आज श्रमदानाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहरातील चैतन्यनगर ते विमानतळ रोड लगतच्या आसना गार्डनमध्ये रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६ सकाळी ६.३० ते ७.३० वाजेपर्यंत प्रमाणात श्रमदानाचे आयोजन करण्यात आले आहे.

या श्रमदानातून गार्डनमधील प्लास्टिक बॉटल, प्लास्टीक पॉकेट, पिशव्या, कागद, काडी, कचरा एकत्र करून त्याची विल्हेवाट लावण्यात येणार आहे. या श्रमदान मोहिमेत आसना गार्डनमध्ये दररोज मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या लोकांनी तसेच स्वयंसेवी संस्थाच्या प्रतिनिधींनी आग्रहाने सहभागी व्हावे, असे आवाहन आसना मॉर्निंग वॉकर्स ग्रुपचे अध्यक्ष आनंदराव कल्याणकर यांनी केले आहे.

सजक नागरिकांनी आसना गार्डनची दुरावस्था होऊ देऊ नये, असे गार्डन पुन्हा पुन्हा तयार केले जाणार नाही, असे भावनिक आवाहन कल्याणकर यांनी नागरिकांना केले आहे. श्रमदानानंतर सकाळी ७.३० वाजता शिव मंदिरच्या बाजूने गार्डनच्या पार्किंगमध्ये एकत्र येऊन या दुष्काळात गार्डन वाचविण्यावर विचारमंथन व एकमेकांचा परिचय करून देण्यात येणार आहे.

आपण सर्वांनी एकत्र येऊन गार्डन स्वच्छता मोहीम राबवूया. कचरा गोळा करूया, परिसर स्वच्छ ठेवूया आणि गार्डनच्या देखभालीसाठी आवश्यक असलेल्या बाबींची नोंद करून संबंधित प्रशासनापर्यंत पोहोचवूया.

आपण रोज गार्डनमध्ये फिरायला येतो; मग त्याच्या संवर्धनासाठी एक तास देऊया. आपण स्वतः सहभागी होऊया आणि आपल्या मित्रांनाही सोबत येऊया, असे आवाहन कल्याणकर यांनी केले आहे.

# डॉ. बानाई महाराष्ट्र राज्य, जनरल सेक्रेटरीपदी इंजि. संजीवन गायकवाड यांची निवड



**नांदेड (प्रतिनिधी)–** बानाई महाराष्ट्र राज्य, जनरल सेक्रेटरीपदी इंजि. संजीवन गायकवाड, माजी उपविभागीय अभियंता जलसंधारण विभाग नांदेड यांची एकमताने निवड करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनियर्स (बानाई) महाराष्ट्र राज्य यांचे राज्यस्तरीय अभियंता संमेलन, सर्वसाधारण सभा व महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी निवडणूक, इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स फिरोधीया हॉल, पुणे येथे दि. १५ नोव्हेंबर २०२६ रोजी पार पडली.

राज्यस्तरीय अभियंता संमेलनाचे उद्घाटन नवलकिशोर राम (भाप्रसे) आयुक्त पुणे महानगरपालिका, पुणे यांच्या हस्ते पार पडले. उद्घाटनपर भाषणात नवलकिशोर राम यांनी अभियंताकडून तंत्रज्ञानासोबतच समाजातील सर्व घटकांच्या विकासासाठी सहाय्य करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून इंजि. धनराज तावडे, माजी सदस्य, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, भारत सरकार, इंजि. भरतकुमार बाविस्कर, अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे, इंजि. जी. एम. कंधारे, माजी सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य व इंजि. प्रदीप नगरारे, ज्येष्ठ अभियंता, नागपूर हे होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात इंजि. कुलदीप रामटेके, माजी अधीक्षक अभियंता जलसंपदा विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी मागासवर्गीय अभियंत्याने एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. तसेच अभियंत्यावरील होणारे अन्याय व बेरोजगार अभियंत्यासाठी शासकीय कंत्राटामध्ये आरक्षण ठेवण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करण्याचे सुचविले.

राजीव नंदकर, प्रसिद्ध लेखक व प्रशिक्षक तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी व निबंधक, यशदा, पुणे यांनी अभियंत्यांची समाज विकासात भूमिका यावरती सविस्तर व्याख्यान दिले. तद्नंतर निवडणूक निर्णय अधिकारी (पान ५ वर)

## शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



**उमरी (प्रतिनिधी)–** हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त उमरी येथे अभिवादन करण्यात आले.

यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख तथा माजी नगराध्यक्ष सुभाष पेरेवार, उपतालुका प्रमुख प्रवीण पाटील ढगे, साईनाथ अरगुलवार, राम पाटील तोडे, कुलजीतसिंघ बावरी, शरद मदनवाद, साईप्रसाद पेरेवार, गणेश गंगासागर, सेवक सिंग, माधव सोळंके यांच्यासह परिसरातील शिवसैनिक उपस्थित होते.

# श्री क्षत्रिय समाज संस्थेतील बोगस सभासद प्रकरणी गुन्हे दाखल करण्याची मागणी

मृत व्यक्तींच्या नावेही सभासद बनवल्याचा दावा; आजीवन सभासदांची इतवारा पोलीस ठाण्यात तक्रार



**नांदेड (प्रतिनिधी)–** गाडीपुरा येथील श्री क्षत्रिय समाज रजिस्टर्ड (एफ-११), श्री रेणुकादेवी मंदिर, नांदेड या सामाजिक संस्थेतील काही पदाधिकाऱ्यांनी संगनमत करून नियमबाह्य व बेकायदेशीररीत्या बँकेत रक्कम भरली. या प्रकारे तब्बल ५०९ बनावटी तसेच मृत व्यक्तींच्या नावे पावत्या तयार करून सभासद नोंदणी केली आहे, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी संबंधित व्यक्तींवर कायदेशीर गुन्हा नोंदवून कठोर कारवाई करण्याची मागणी संस्थेचे आजीवन सभासद कन्हैयासिंह ठाकूर यांनी इतवारा पोलीस ठाण्याचे निरीक्षक यांच्याकडे केली आहे.

कन्हैयासिंह ठाकूर यांच्या या मागणीला संस्थेच्या ५० हून अधिक सभासदांनी शनिवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी प्रत्यक्ष इतवारा पोलीस ठाण्यात जाऊन पाठिंबा दर्शवला. संस्थेची व समाजाची घटनात्मक दृष्टीने छबी मलीन होऊ नये आणि कारभार पारदर्शक व घटनेनुसार चालावा, या उद्देशाने आम्ही एकत्र आलो असल्याचे सभासदांनी स्पष्ट केले. या संदर्भात दि. २६ सप्टेंबर २०२६ रोजी इतवारा पोलीस ठाण्यात अर्ज देऊन सुमारे दीड महिना उलटूनही कार्यवाही न झाल्याने सभासदांनी पुन्हा निवेदन सादर केले.

निवेदनात नमूद केल्यानुसार, संस्थेतील कथित बेकायदेशीर व अपात्र कार्यकारिणी मंडळातील काही व्यक्ती मनमानी पद्धतीने कारभार चालवत असून, गेल्या ८ ते ९ वर्षांपासून नियमबाह्य कृत्ये करत आहेत. तसेच या मंडळातील काही जणांकडून अर्जदारांना व त्यांच्या हितसंबंधितांना धमकावले जात असल्याचा, मानसिक त्रास दिला जात असल्याचा आणि समाजात शांतता भंग होण्याची शक्यता असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

न्यायालयीन आदेशांचाही अवमान केला जात असून, यापूर्वी कन्हैयासिंह ठाकूर आणि मंगलसिंह ठाकूर यांनी केलेल्या नियमानुसारच्या मागण्यांना संपूर्ण पाठिंबा असल्याचेही सभासदांनी निवेदनात स्पष्ट केले आहे. यापुढे कोणताही अनुचित प्रकार किंवा गैरप्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अपात्र पदाधिकारी व त्यांच्या सहयोगींवर राहील, असा इशारा देत या प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आजीवन सभासदांनी केली आहे.

## 'यशवंत' च्या उपप्राचार्यपदी डॉ. कविता सोनकांबळे यांची नियुक्ती



**नांदेड (प्रतिनिधी)–** श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित यशवंत महाविद्यालयाच्या उपप्राचार्यपदी राज्यशास्त्र विभागातील डॉ.कविता सोनकांबळे यांची दुसऱ्यांदा उपप्राचार्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

यशवंत महाविद्यालयाच्या पहिल्या महिला उपप्राचार्यपदी डॉ. कविता सोनकांबळे यांनी गत तीन वर्षे यशस्वीरित्या विद्यार्थीकेंद्रित प्रशासक म्हणून कारकीर्द पूर्ण केल्यानंतर त्यांची पुनर्नियुक्ती करण्यात आल्याबद्दल माजी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांच्या हस्ते राज्यशास्त्र विभागाच्या वतीने पुष्पगुच्छ व ग्रंथभेट देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी कार्यालयीन प्रबंधक संदीप पाटील, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अजय गव्हाणे, डॉ. वीरभद्र स्वामी यांची उपस्थिती होती.

# नांदेडच्या डॉ. विलास धर्माधिकारी यांना मलेशियातील आंतरराष्ट्रीय हृदयरोग परिषदेसाठी निमंत्रण

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रतिबंधात्मक हृदयरोग उपचार आणि ईईसीपी (बाह्य प्रतिधडधड उपचार पद्धती) या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे नांदेड येथील तज्ज्ञ डॉक्टर डॉ. विलास पंडितराव धर्माधिकारी यांना मलेशियात आयोजित करण्यात येणाऱ्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय ईसीपी परिषद २०२६ साठी अधिकृत निमंत्रण मिळाले आहे. मराठवाड्यातील नांदेड विभागातून या क्षेत्रातील एकमेव तज्ज्ञ म्हणून त्यांना मिळालेल्या या निमंत्रणामुळे नांदेडच्या वैद्यकीय क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.



मलेशियन ईसीपी उपचार पद्धती संघटनेच्या वतीने ही आंतरराष्ट्रीय परिषद २८ व २९ नोव्हेंबर २०२६ रोजी मलेशियाची राजधानी क्वालालंपूर येथील विंडहॅम ग्रँड हॉटेल बांगसार येथे आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेसाठी विविध देशांतील हृदयरोग तज्ज्ञ, वैद्यकीय संशोधक, डॉक्टर आणि आरोग्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

नांदेड येथील दत्तकृपा ईईसीपी सेंटर आणि संभाजीनगर हार्ट केअर सेंटरच्या माध्यमातून डॉ. विलास धर्माधिकारी हे ईईसीपी उपचार पद्धती आणि शरीरशुद्धी उपचार क्षेत्रात कार्यरत आहेत. हृदयविकार होण्यापूर्वीच त्याचा धोका ओळखणे, हृदयाचे आरोग्य जपण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे तसेच आधुनिक उपचार पद्धतींबाबत जनजागृती करणे, या दृष्टिकोनातून त्यांचे कार्य महत्त्वपूर्ण ठरत आहे.

या आंतरराष्ट्रीय परिषदेत ईईसीपी उपचार पद्धतीतील नवनवीन संशोधन, आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान, उपचारांचे अनुभव आणि हृदयविकाराच्या प्रतिबंधासाठी उपलब्ध असलेल्या विविध उपाययोजनांवर सखोल चर्चा होणार आहे. विविध देशांतील तज्ज्ञांशी संवाद साधण्याची तसेच जागतिक स्तरावरील वैद्यकीय प्रगती जाणून घेण्याची संधी या निमित्ताने डॉ. धर्माधिकारी यांना मिळणार आहे.

नांदेडसारख्या शहरातून प्रतिबंधात्मक हृदयरोग उपचार क्षेत्रात कार्य करणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदेसाठी निमंत्रित केले जाणे, ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. त्यांच्या या निवडीमुळे नांदेडसह संपूर्ण मराठवाड्याच्या वैद्यकीय क्षेत्राची आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख अधिक दृढ होण्यास मदत होणार असून, त्यांच्या या कामगिरीचे वैद्यकीय क्षेत्रातून कौतुक होत आहे.

## कुंडलवाडीचे सहायक सरकारी अभियोक्ता संदीप कुंडलवाडीकर यांना पोलीस अधीक्षकांकडून प्रशंसापत्र

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** कुंडलवाडी येथील रहिवासी तथा बिलोली येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात सहायक सरकारी अभियोक्ता म्हणून कार्यरत असलेले ॲड. संदीप कुंडलवाडीकर यांना त्यांच्या उत्कृष्ट कायदेशीर कामगिरीबद्दल नांदेडचे पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन (भा.पो.से.) यांच्या हस्ते प्रशंसापत्र देऊन गौरविण्यात आले.



देगलूर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक २९८/२०२३ मधील भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ अंतर्गत खून प्रकरणात आरोपीला दोषी ठरविण्यात यश मिळाले. या प्रकरणात ॲड. संदीप कुंडलवाडीकर यांनी केलेली प्रभावी बाजू मांडणी, उत्कृष्ट कायदेशीर कौशल्य, व्यावसायिक समर्पण, सखोल तयारी आणि न्याय मिळवून देण्यासाठी घेतलेले परिश्रम यांची विशेष दखल नांदेड पोलीस अधीक्षक कार्यालयाने घेतली.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड यांच्या वतीने दि. ७ नोव्हेंबर २०२६ रोजी त्यांना 'प्रशंसापत्र' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. न्यायव्यवस्थेतील त्यांच्या निष्ठेचे, कार्यतत्परतेचे आणि प्रभावी अभियोग चालविण्याच्या क्षमतेचे हे कौतुक असल्याचे मानले जात आहे.

या सन्मानामुळे कुंडलवाडी शहराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अण्णाभाऊ प्रेमींनो, एक व्हा! पंतप्रधानांना लाखो पत्रे पाठवून भारतरत्नासाठी आवाज बुलंद करा

## ॲड. प्रदीप बाऱ्हाळीकर यांचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर 'भारतरत्न' देऊन गौरविण्यात यावे, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.



भारतरत्न हा भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान असून, तो मानवी प्रयत्नांच्या कोणत्याही क्षेत्रात असाधारण सेवा किंवा सर्वोच्च दर्जाची कामगिरी करणाऱ्या व्यक्तीला दिला जातो. साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांनी केवळ दीड दिवस शाळा शिकून साहित्याच्या क्षेत्रात, गोवा मुक्ती व संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात असाधारण सेवा देऊन सर्वोच्च दर्जाची कामगिरी केली आहे.

ही बाब भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना माहिती असून तसे त्यांनी त्यांच्या भाषणात पूर्वीच सांगितले आहे. म्हणून भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताचे महामहीम राष्ट्रपती यांना शिफारस करून येणाऱ्या १ ऑगस्ट २०२७ पर्यंत साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर 'भारतरत्न' हा सन्मान मिळवून द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

भारत देशाच्या कानाकोपऱ्यातील व परदेशातील सर्व लोकशाहीर अण्णाभाऊ साठेप्रेमींनी, मातंग समाजाच्या प्रत्येक व्यक्तीने वरीलप्रमाणे संदेश, पत्र, निवेदन, मागणीपत्र -पंतप्रधान नरेंद्र मोदी, भारत सरकार, प्रधानमंत्री कार्यालय, नवी दिल्ली यांच्या नावे व्हॉट्सअप, पोस्ट, संदेश, पोस्ट ऑफिसद्वारे किंवा तहसीलदार, उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी यांच्यामार्फत आजपासून लाखोंच्या संख्येने पाठविल्यास, येणाऱ्या १ ऑगस्ट २०२७ पर्यंत साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांना 'भारतरत्न' हा नागरी सन्मान दिला जाईल, अशी खात्री ॲड. प्रदीप बाऱ्हाळीकर यांच्या वतीने व्यक्त करण्यात येत आहे.

वेगळी वाट

आयशा रझा यांची विशेष मुलाखत

# एकाच प्रकारच्या भूमिकांमधून बाहेर पडणे कलाकारांच्या हातात नाही...

## दिग्दर्शकांचा विश्वास मिळाला तरच वेगळ्या भूमिका साकारता येतात!



**हिंदी चित्रपटसृष्टीत अनेकदा गुणवान कलाकारांना ठरावीक प्रकारच्या भूमिकांमध्येच वारंवार संधी दिली जाते. त्यामुळे त्यांच्या अभिनयातील विविध पैलू प्रेक्षकांसमोर येत नाहीत. अभिनेत्री आयशा रझा यांनीही या अनुभवावर परखड मत व्यक्त केले आहे. 'एकाच प्रकारच्या भूमिकांमध्ये अडकून पडण्याची परिस्थिती बदलणे हे कलाकारांच्या हातात नसते. एखाद्या दिग्दर्शकाने आपल्यावर विश्वास दाखवून वेगळ्या धाटणीची भूमिका दिली, तरच आपल्याला स्वतःमधील अभिनयाचे नवे पैलू दाखवता येतात,' असे त्यांनी स्पष्ट केले.**

'वीरे दी वेडिंग', 'तू झूठी मैं मक्कार', 'गुंजन सक्सेना : द कारगिल गर्ल' आणि 'सोनू के टीटू की स्वीटी' यांसारख्या लोकप्रिय चित्रपटांमध्ये आईच्या भूमिका साकारून आयशा रझा यांनी प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. सध्या त्या 'मीठे में क्या है' या कौटुंबिक चित्रपटातील अमृता या आईच्या भूमिकेमुळे चर्चेत आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीत निरुपा रॉय, रीमा लागू आणि फरीदा जलाल यांच्याप्रमाणेच आयशा रझा यांचीही ओळख आईच्या भूमिकांसाठी निर्माण झाली आहे. मात्र, एकाच प्रकारच्या भूमिकांमध्ये अडकून पडण्याबाबत त्यांनी विशेष मुलाखतीत आपली भूमिका मांडली.

### कलाकारांनी मिळालेल्या कामाबद्दल कृतज्ञ असावे

आयशा रझा म्हणाल्या, की मी अनेकदा मनोज पाहवा यांचे उदाहरण देते. त्यांनाही बराच काळ पंजाबी व्यक्ती किंवा विनोदी स्वभावाच्या काकांच्या भूमिका मिळत राहिल्या. आम्ही एकत्र अनेक चित्रपट करतो. त्यामुळे अनेकदा मी पंजाबी आई आणि ते पंजाबी वडील, अशा भूमिका करत असल्याची गंमतही आमच्यात रंगते. याबाबत आम्ही एकमेकांशी अनेकदा चर्चा करतो. त्या म्हणाल्या, की अनुभव सिन्हा यांच्यासारख्या दिग्दर्शकाने 'मुल्क' चित्रपटात मनोज पाहवा यांना पूर्णपणे वेगळ्या स्वरूपाची भूमिका दिली. त्यावेळी अनेक निर्मात्यांना वाटत होते की, प्रेक्षक मनोज यांना अशा भूमिकेत स्वीकारणार नाहीत. कारण प्रेक्षकांच्या मनात त्यांची प्रतिमा विनोदी कलाकाराची होती. मात्र, अनुभव सिन्हा यांचा मनोज यांच्या अभिनयक्षमतेवर पूर्ण विश्वास होता. मनोज किती उत्तम अभिनेता आहे आणि त्यांच्याकडून काय करून घेता येऊ शकते, याची त्यांना जाणीव होती. त्यांचा हा विश्वास सार्थ ठरला. त्यामुळे कलाकाराला वेगळ्या भूमिकेत सादर करण्यासाठी दूरदृष्टी असलेला आणि त्याच्यावर विश्वास ठेवणारा दिग्दर्शक मिळणे आवश्यक आहे.

### मिळालेल्या संधींचा आनंद घ्यायला हवा

आपले पती आणि अभिनेते कुमुद मिश्रा यांच्याकडून आपण एक महत्त्वाची गोष्ट शिकलो असल्याचे आयशा यांनी सांगितले. त्या म्हणाल्या, की आपण केलेल्या कामाबद्दल कधीही कृतघ्न असू नये, हे मी माझ्या पतीकडून शिकले आहे. आपल्यापेक्षा कितीतरी अधिक गुणवान कलाकार केवळ एका संधीच्या प्रतीक्षेत आहेत. निदान आपल्याला कामाच्या संधी मिळत आहेत, हीसुद्धा मोठी गोष्ट आहे. त्यामुळे मिळालेली प्रत्येक भूमिका उत्तम प्रकारे साकारावी, तिचा आनंद घ्यावा आणि त्यातून काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न करावा. त्या म्हणाल्या, की नशिबाने साथ दिली तर वेगळ्या भूमिका नक्कीच मिळतील. तसे झाले नाही, तरी आपल्याकडे रंगभूमी आहे. तिथे आपल्या मनातील भावना आणि अभिनयातील वेगळेपण व्यक्त करता येईल. आपल्याला काम मिळत आहे, हीदेखील एक प्रकारची देणगी आहे. सतत नाराज राहून किंवा मनात खंत बाळगून काम करता येत नाही.

### घरातील कणखर महिलांचा मोठा प्रभाव

आयशा रझा या ज्येष्ठ अभिनेत्री जोहरा सहगल आणि उजरा बट यांच्या नात्यातील पुढील पिढीतील सदस्य आहेत. त्यांच्या कुटुंबातील कर्तृत्ववान महिलांचा आयशा यांच्या व्यक्तिमत्त्वावर आणि विचारांवर मोठा प्रभाव पडला आहे. याबाबत त्या म्हणाल्या, की माझ्या आजी आणि नानी दोघीही नोकरी करणाऱ्या आणि स्वतंत्र विचारांच्या महिला होत्या. माझी आजी बीबीसीच्या उर्दू सेवेत वृत्तनिवेदिका म्हणून काम करणाऱ्या पहिल्या महिला होत्या, तर माझी नानी हाजरा बेगम या स्वातंत्र्यसैनिक आणि प्रगतिशील लेखक संघाच्या सदस्या होत्या. आमच्या घरी कृष्णचंदर आणि कैफी आझमी यांसारख्या साहित्यिकांचे येणे-जाणे असायचे. अशा वातावरणात मी लहानाची मोठी झाले. त्या म्हणाल्या, की माझ्या नानीच्या दोन बहिणी म्हणजे जोहरा सहगल आणि उजरा बट. त्यांचे कुटुंब पारंपरिक आणि रूढीवादी विचारांचे होते. मात्र, त्यांनी या चौकटी मोडून स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली, असे त्यांनी सांगितले.

### रूढीवादी वातावरणातून बाहेर पडून मार्ग निवडला

आपल्या कुटुंबातील महिलांनी त्या काळात घेतलेले धाडसी निर्णय आजही प्रेरणादायी असल्याचे आयशा यांनी सांगितले. त्या म्हणाल्या, की अशा पारंपरिक कुटुंबातून बाहेर पडून त्यांनी नृत्य करायचे, अभिनय करायचा आणि रंगभूमीवर काम करायचे, असे ठरवले. जोहरा सहगल यांनी आपल्या वडिलांना आपण आपल्यापेक्षा आठ वर्षांनी लहान असलेल्या हिंदू तरुणाशी विवाह करू इच्छित असल्याचे सांगितले होते. १९३० च्या दशकात असा निर्णय घेणे ही खूप मोठी गोष्ट होती. त्या म्हणाल्या, की माझ्या आईनेही आपल्या मावशींकडून प्रेरणा घेत रंगभूमीवर काम केले आणि अभिनेत्री म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली. त्यामुळे माझ्यासाठी अभिनयक्षेत्रात येण्याचे मार्ग आधीपासूनच खुले होते. खरे सांगायचे तर, माझ्या कुटुंबातील या महिलांनी माझ्यासाठी अनेक दरवाजे उघडून ठेवले होते. त्यामुळे मला संघर्षापेक्षा स्वतःसाठी नवी आव्हाने शोधण्याची आणि स्वतःच्या अभिनयक्षमतेचा अधिकाधिक विस्तार करण्याची गरज आहे. त्यांनी दिलेला वारसा माझ्यासाठी अत्यंत मोलाचा आहे.


अभिनेते शरद कपूर यांची विशेष मुलाखत

# समाजमाध्यमे माझ्यासाठी ठरली वरदान

## वाईट काळ कितीही कठीण असला तरी दमदार पुनरागमन करणार!

**अभिनेता शरद कपूर यांची सध्या त्यांच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे आणि प्रकृतीच्या समस्यांमुळे चर्चा सुरू आहे. त्यांच्या मदतीसाठी अभिनेता सोनू सूद, सलमान खान यांच्यासह चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकार पुढे आले आहेत. विशेष म्हणजे, अभिनेता शाहरुख खाननेही फोन करून मदतीचे आश्वासन दिल्याचा खुलासा शरद कपूर यांनी केला आहे. आयुष्यात कितीही कठीण काळ आला तरी आपण दमदार पुनरागमन करणार, असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला.**

'स्वाभिमान', 'दस्तक', 'तमन्ना', 'जोश', 'खौफ', 'लक्ष्य' आणि 'नो मीन्स नो' यांसारख्या चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या भेटीला आलेले शरद कपूर गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहेत. त्यांच्या प्रकृतीची आणि आर्थिक परिस्थितीची माहिती देणारे काही व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाले होते. त्यांच्या पाळीव कुत्र्यांच्या सुरक्षिततेसाठी त्यांनी मदतीचे आवाहन केले होते. त्यानंतर अनेकांनी त्यांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला. एका विशेष मुलाखतीत शरद यांनी आपल्या आयुष्यातील कठीण काळ, चित्रपटसृष्टीतील मित्रांकडून मिळणारा आधार आणि आगामी कामाबाबत मनमोकळेपणाने संवाद साधला.



### कुटुंबीयांनी शक्य ती मदत केली...

कोलकाता येथे बालपण गेलेल्या शरद यांनी आपल्या कुटुंबाविषयीही माहिती दिली. ते म्हणाले, 'आज माझे आई-वडील हयात नाहीत; मात्र माझे बालपण खूप छान गेले. सेंट झेवियर्स महाविद्यालयात मी शिक्षण घेतले. कोलकात्यातील लोकांचे माझ्यावर खूप प्रेम आहे. केवळ मुंबईतच नव्हे, तर संपूर्ण देशात मला प्रेम मिळाले आहे. माझे दोन भाऊ, भावजय आणि त्यांची मुले आहेत. मी कुटुंबीयांच्या सतत संपर्कात असतो.' समाजमाध्यमांवर आपली बिकट परिस्थिती दाखवणारे व्हिडिओ प्रसारित झाल्यानंतर कुटुंबीयांची प्रतिक्रिया काय होती, असे विचारले असता ते म्हणाले, 'माझ्या आयुष्यात कठीण काळ सुरू असल्याची कुटुंबीयांना कल्पना आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात चांगला आणि वाईट काळ येत असतो, हे त्यांना माहीत आहे. हा केवळ आयुष्यातील एक वळण आहे, शेवट नाही. कुटुंबीयांनी त्यांच्या परीने शक्य ती मदत केली आहे; मात्र त्यांच्याही काही मर्यादा आहेत.'

### शाहरुख खानचा फोन; लवकरच आर्यनची भेट घेणार

अभिनेता सोनू सूद आणि सलमान खान यांच्याप्रमाणेच शाहरुख खाननेही मदतीचा हात पुढे केल्याचे शरद यांनी सांगितले. 'जोश' चित्रपटातील सहकलाकार शाहरुख खानने काही मदत देऊ केली आहे का, असे विचारले असता ते म्हणाले, 'होय, नक्कीच! मी लवकरच आर्यनला भेटणार आहे. शाहरुखने मला फोन करून, तुम्हाला जे योग्य वाटेल ते करा, मी तुमच्या मदतीसाठी तयार आहे, असे सांगितले. शाहरुखसोबत 'जोश' चित्रपटाच्या अनेक सुंदर आठवणी आहेत. तो अत्यंत आत्मविश्वासपूर्ण अभिनेता आहे. आम्ही एकत्र बसून आमच्या दृश्यांवर चर्चा करायचो. ऐश्वर्याही खूप प्रेमळ आहे. तिच्यासोबत काम करतानाही खूप आनंद मिळाला.'

### संजय दत्त यांनीही दिला धीर

अभिनेते अमिताभ बच्चन यांच्यासोबत 'लक्ष्य' चित्रपटात काम केलेल्या शरद यांना बच्चन यांचाही फोन आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच संजय दत्त यांनीही त्यांना धीर दिला. 'हथियार', 'खौफ' आणि 'एलओसी कारगिल' या चित्रपटांमध्ये संजय दत्त यांच्यासोबत काम करण्याचा अनुभव शरद यांना आहे. ते म्हणाले, की 'संजय दत्त यांनी मला काळजी करू नकोस, स्वतःच्या प्रकृतीची काळजी घे. तुला पुन्हा चित्रपटसृष्टीत परतायचे आहे. आम्ही सर्व तुझ्यासोबत आहोत, असे सांगितले. त्यांनी स्वतः तुरुंगवास अनुभवला आहे, वडिलांना गमावले आहे आणि आयुष्यात अनेक कठीण प्रसंगांचा सामना केला आहे.' याशिवाय राज ठाकरे आणि मुख्यमंत्री यांच्यासारख्या मान्यवरांचेही फोन आल्याचे त्यांनी सांगितले. 'या सर्वांनी मला खूप आधार दिला. हे लोक माझ्यासाठी कुटुंबीयांसारखे आहेत. मी त्यांचा नेहमीच आदर करेन. प्रसारमाध्यमे, समाजमाध्यमे आणि वृत्तवाहिन्यांनीही मला मोठा पाठिंबा दिला आहे,' असे ते म्हणाले. पल्या नावाने आर्थिक व्यवहारांबाबत काही चुकीच्या बातम्या पसरवल्या जात असल्याचा आरोपही शरद यांनी केला. ते म्हणाले, 'काही लोकांनी पैशांच्या व्यवहारांबाबत खोट्या बातम्या पसरवल्या. माझ्याकडे कोणताही क्यूआर कोड नाही आणि मी कोणाकडेही पैसे मागितलेले नाहीत. मला पैसे देऊ नका, असे मी स्पष्टपणे सांगितले आहे. मी कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेची जाहिरात केलेली नाही.' समाजमाध्यमांच्या प्रभावाविषयी बोलताना ते म्हणाले, 'आज समाजमाध्यमे माझ्यासाठी वरदान ठरली आहेत. मी चित्रपटसृष्टीत आलो तेव्हा केवळ मुद्रित माध्यमांचा प्रभाव होता. आता समाजमाध्यमांची पोहोचच प्रचंड वाढली आहे.'

### खान यांच्या चित्रपटातून पुनरागमन

मुलाखतीच्या सुरुवातीलाच शरद यांनी गोड पदार्थांची आवड असल्याचे सांगत वातावरण हलकेफुलके केले. ते म्हणाले, 'मला गोड खाण्याची खूप आवड आहे. थोडा ताण जाणवला की काहीतरी गोड खाल्ले की ऊर्जा मिळते.' आपल्या प्रकृतीविषयी ते म्हणाले, 'माझे पाळीव कुत्रे माझ्यापासून दूर गेले होते आणि त्यातच माझ्या पायाला दुखापत झाली. त्यामुळे मी खूप निराश झालो होतो. मात्र, आता मी पुनरागमनाच्या तयारीला लागलो आहे. दोन-तीन चित्रपट स्वीकारले आहेत. सध्या त्यांचे प्राथमिक काम सुरू असल्याने त्याबाबतची घोषणा नंतर करेन. तूर्तास दिग्दर्शक अहमद खान यांच्या चित्रपटातून पुनरागमन करणार आहे. या चित्रपटात माझी नकारात्मक भूमिका असेल. भविष्यात जी भूमिका आवडेल, ती नक्कीच साकारेन. आता माझी प्रकृती बऱ्यापैकी सुधारली आहे.'

### उपचारांसाठी कर्जतला जाणार

अभिनेता सोनू सूद यांनी शरद कपूर यांच्या मदतीसाठी पुढाकार घेत त्यांच्या पायावरील उपचारांची व्यवस्था केली आहे. याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना शरद म्हणाले, की 'मी सोनू सूद यांचा मनापासून आभारी आहे. उपचारांसाठी मी कर्जत येथे जाणार आहे. तिथे सोनू यांच्या मित्राचे आरोग्य केंद्र आहे. माझ्या उपचारांची संपूर्ण व्यवस्था त्यांनी केली आहे. ते अत्यंत दयाळू व्यक्ती आहेत. तिथे दाखल होऊन पूर्णपणे तंदुरुस्त झाल्यानंतर लवकरच परतणार आहे.'

### अडचणींमुळे कामापासून दूर

चित्रपटसृष्टीत जवळपास ३० वर्षे काम केलेल्या शरद यांनी आपल्या कारकिर्दीतील कठीण काळाबाबतही भाष्य केले. ते म्हणाले, 'वैयक्तिक आयुष्यात काही अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे काम करण्याची इच्छाच होत नव्हती. काही काळ मी मानसिकदृष्ट्या विचलित झालो होतो. मात्र, आता देवाच्या कृपेने सर्व काही सुरळीत होत आहे. काम हेच सर्वस्व असल्याची जाणीव मला झाली. मी नैराश्यात होतो असे नाही; मात्र प्रत्येकाच्या आयुष्यात असा एक टप्पा येतो, जेव्हा काहीही करण्याची इच्छा होत नाही. मी गेली ३० वर्षे सातत्याने काम केले आहे. मला काम मिळणे बंद झाले होते, असेही नाही. चित्रपटसृष्टीतील लोकांनी नेहमीच मला साथ दिली आहे.'



### जोमाने सुरुवात करेन...

आपल्या भविष्यातील वाटचालीबाबत शरद कपूर यांनी ठाम विश्वास व्यक्त केला. ते म्हणाले, 'वेळ कितीही वाईट असली तरी मी दमदार पुनरागमन करणारच, असा निर्धार मी केला होता. एकदा बी. आर. चोप्रा यांच्या घरासमोरून जात असताना महेश भट्ट यांनी मला हाक मारली आणि 'स्वाभिमान' मालिकेत काम करण्याची संधी दिली. एकदा पोहण्याचा सराव करत असताना एका दिग्दर्शकाने मला पाहिले आणि चित्रपटातील भूमिकेची ऑफर दिली. लवकरच पूर्णपणे तंदुरुस्त होऊन पुन्हा जोमाने कामाला सुरुवात करेन.'

# काव्या मारनने कर्मचाऱ्यांना वाटल्या सोन्याच्या अंगठ्या!





**प्रसिद्ध उद्योजक कलानिधी मारन यांच्या कन्या आणि सनरायझर्स हैदराबाद संघाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी काव्या मारन यांनी आपल्या विवाहाच्या स्वागत समारंभापूर्वी कर्मचाऱ्यांना अनोखी भेट देऊन सर्वांची मने जिंकली आहेत. त्यांनी सन ग्रुपमधील कर्मचाऱ्यांना सोन्याच्या अंगठ्या, चॉकलेट आणि विशेष भोजन समारंभाचे निमंत्रण असलेली भेटवस्तूंची पेटी दिली आहे. या भेटवस्तूंचा व्हिडिओ सध्या समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत आहे.**

समोर आलेल्या व्हिडिओमध्ये सन ग्रुपचे कर्मचारी काव्या मारन यांच्याकडून मिळालेल्या भेटवस्तूंची पेटी उघडताना दिसत आहेत. या पेटीत निमंत्रणपत्रिका, चॉकलेट आणि सोन्याची अंगठी आहे. याशिवाय, २५ नोव्हेंबर रोजी आयोजित भोजन समारंभाचे निमंत्रणही देण्यात आले आहे. एका कर्मचाऱ्याने या भेटीबद्दल आश्चर्य व्यक्त केले. सोन्याच्या अंगठ्या मिळाल्याने आनंद झाल्याचे त्याने सांगितले. या भेटीमुळे कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, संगीतकार अनिरुद्ध रविचंदर (वय ३६) आणि काव्या मारन (वय ३४) यांचा ११ नोव्हेंबर रोजी ग्रीसमध्ये खासगी समारंभात विवाह झाला. या विवाहासाठी पारंपरिक धार्मिक विधींऐवजी आत्मसन्मान विवाह पद्धतीचा अवलंब करण्यात आला. या विवाह सोहळ्याला अभिनेते रजनीकांत यांच्यासह कुटुंबीय उपस्थित होते. आता या नवदाम्पत्याचा भव्य स्वागत समारंभ २१ नोव्हेंबर रोजी चेन्नई येथे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि तमिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्यासह राजकीय, उद्योग आणि चित्रपट क्षेत्रातील अनेक मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे.

# ७३ बोगस शिक्षकांची सेवा समाप्त; आणखी २,२१७ शिक्षकांवर कारवाईची टांगती तलवार, शिक्षण क्षेत्रात खळबळ

**बीड (प्रतिनिधी)–** राज्यात गेल्या काही वर्षात बीड जिल्हा केंद्रस्थाना राहिला असून बीडमधील गुन्हेगारीचे व्हायरल व्हिडिओ, दिवंगत सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरण, वाल्मिक कराडसह इतरही प्रकरणांमुळे बीड जिल्ह्याची चर्चा होत आहे. त्यातच, आता बोगस शिक्षक भरती प्रकरणात बीड जिल्ह्यात शिक्षण विभागाने मोठी कारवाई केल्याने खळबळ उडाली आहे. येथील प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या खासगी अनुदानित शाळांमधील ७३ शिक्षकांची सेवा थेट समाप्त करण्यात आली आहे. त्यात प्राथमिक विभागातील ७ तर माध्यमिक विभागातील ६६ शिक्षकांचा समावेश आहे.




राज्यात २०१२ पासून शिक्षक भरती बंद असतानाही या शिक्षकांची भरती करण्यात आली. न्यायालयांच्या सूचनांचा सोयीस्कर अर्थ लावून यांना नियुक्ती दिल्या गेल्या. काही ठिकाणी संच मान्यतेच्या दुरुस्तीच्या नावाखाली पदं वाढवण्यात आली आहेत. तर इतर ठिकाणी बनावट विद्यार्थ्यांच्या आधारे संच मान्यतेचे पद वाढवण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. त्यासाठी अन्य बनावट कागदपत्रे वापरले. त्यावरुन, शिक्षण विभागाने ७३ शिक्षकांची सेवा समाप्त करत सर्वांना धक्का दिलाय. याप्रकरणी आणखी २२१७ बोगस पद निर्माण करुन भरती केलेल्या शिक्षकांवर कारवाईची टांगती तलवार असल्याची माहिती याबाबत तक्रारीतून पाठपुरावा करणाऱ्या सादेक इनामदार यांनी दिली. शिक्षक भरती प्रकरणात बीड येथील सामाजिक कार्यकर्ते सादेक इनामदार यांनी एसआयटीकडे तक्रार केली होती. त्यानंतर, ही कारवाई करण्यात आली असून या कारवाईनंतर बीड शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे.

दरम्यान, यापूर्वीही जानेवारी २०२३ मध्ये बीड जिल्ह्यात बोगस दिव्यांग प्रमाणपत्र काढणाऱ्या ५२ शिक्षकांच्या प्रमाणपत्राची चौकशी केल्यानंतर यामध्ये दोषी आढळलेल्या शिक्षकांवर बीडचे तत्कालीन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार यांनी तात्काळ निलंबनाची कारवाई केली होती. बदली करण्यासाठी अनेक शिक्षकांनी बोगस दिव्यांग प्रमाणपत्र काढल्याचे उघड झाल्यानंतर २३६ शिक्षकांची अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात पुनर्तपासणीच्या करण्यात आली होती. त्यामध्ये ५२ शिक्षकांनी बोगस प्रमाणपत्र तयार केल्याचे उघड झाल्यानंतर, त्यांची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करत निलंबनाची कारवाई केली होती. या कारवाईनंतरही शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

# काश्मीर खोऱ्यात एकही स्थानिक दहशतवादी सक्रिय नाही –केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पुलवामामध्ये पोलिसांनी लष्कर ए तोयबाचा एक दहशतवादी ठार केल्यानंतर काश्मीर खोऱ्यात कोणताही स्थानिक दहशतवादी सक्रिय राहिला नसल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शनिवारी (२१ नोव्हेंबर) सांगितले. अमित शाह यांनी लतीफ याला या गटाचा शेवटचा सक्रिय काश्मिरी सदस्य म्हटले आणि खोऱ्यात अजूनही कार्यरत असलेले इतर दहशतवादी हे परदेशी नागरिक असल्याचे सांगितले. अरुणाचल प्रदेश येथील बांदरदेवी येथे राज्य पोलिसांना राष्ट्रपतींचा ध्वज प्रदान करण्याच्या समारंभात अमित शाह यांनी ही टिप्पणी केली. आपल्या भाषणात, त्यांनी १९९० च्या दशकात काश्मीरमधील सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या भूमिकेचा आढावा घेतला आणि २०१९ मध्ये केंद्र सरकारने कलम



३७० रद्द करण्याच्या निर्णयावरील चर्चेला पुन्हा उजाळा दिला.

'काश्मीरमधील पुलवामा येथे काश्मीर पोलिसांनी लष्कर ए तोयबाशी संबंधित शेवटच्या ज्ञात सक्रिय काश्मिरी दहशतवाद्याला चकमकीत ठार केले. त्यामुळे आज मी अभिमानाने सांगू शकतो की काश्मीर खोऱ्यात एकही स्थानिक दहशतवादी शिल्लक राहिलेला नाही. जे काही उरले आहेत, ते सर्व परदेशी दहशतवादी आहेत. हा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे, जो आपल्या सुरक्षा दलांनी आणि गुप्तचर संस्थांनी ३५ वर्षांच्या प्रदीर्घ संघर्षानंतर, त्यांच्या सातत्यपूर्ण शौर्याद्वारे, निष्ठेद्वारे आणि बलिदानाद्वारे गाठला आहे.' असे अमित शाह म्हणाले. शाह यांनी आठवण करून दिली की, १९९० च्या दशकात दहशतवादाच्या काळात, भारत काश्मीरवर ताबा ठेवू शकेल का, असा प्रश्न लोकांनी उघडपणे उपस्थित केला होता. फारुख अब्दुल्ला यांचा उल्लेख करत ते म्हणाले की, तत्कालीन मुख्यमंत्री इंग्लंडला निघून गेले होते. शाह यांनी त्या काळात खोऱ्यात कार्यरत असलेल्या सुरक्षा दलांना काश्मीरला देशाशी एकसंध ठेवण्याचे श्रेय दिले. 'मला या देशातील लोकांना १९९० च्या दशकातील काश्मीर खोर्‍यातील परिस्थितीची आठवण करून द्यायची आहे, ज्या काळात आपण काश्मीरवर किती काळ ताबा ठेवू शकू, असा प्रश्न अनेकांना पडला होता,' असे ते म्हणाले.

# १० जानेवारीपासून जनगणना २०२७ ची स्वयं-गणना; महाराष्ट्रात २५ जानेवारीपासून घरोघरी सर्वेक्षण

**मुंबई (प्रतिनिधी)–** जनगणना २०२७ च्या दुसऱ्या टप्प्यातील लोकसंख्या गणनेचे काम अचूक, पारदर्शक आणि निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने या कामास सर्वोच्च प्राधान्य द्यावे. जनगणनेच्या माध्यमातून संकलित होणारी माहिती पुढील नियोजन आणि विविध विकासकामांसाठी महत्त्वपूर्ण असल्याने सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दिले. जनगणना २०२७ च्या दुसऱ्या टप्प्याच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी प्रधान जनगणना अधिकाऱ्यांची राज्यस्तरीय परिषद २१ नोव्हेंबर रोजी सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचे उद्घाटन मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या आभासी उपस्थितीत झाले.

महाराष्ट्रात १० ते २४ जानेवारी २०२७ या कालावधीत नागरिकांना ऑनलाइन स्वयं-गणना पोर्टलद्वारे स्वतःची माहिती नोंदवता येणार आहे. त्यानंतर २५ जानेवारी ते २८ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत प्रगणक घरोघरी जाऊन लोकसंख्या गणना करतील. २८ फेब्रुवारीच्या मध्यरात्री बेघर लोकसंख्येची गणना करण्यात येईल, तर १ ते ५ मार्च २०२७ या कालावधीत पुनरावलोकन फेरी होणार आहे. या टप्प्यात नागरिकांची लोकसंख्याशास्त्रीय, सामाजिक आणि आर्थिक माहिती संकलित करण्यासाठी ४० प्रश्नांची डिजिटल प्रश्नावली वापरण्यात येणार आहे. यामध्ये नाव, कुटुंबप्रमुखाशी असलेले नाते, लिंग, वय, वैवाहिक स्थिती, धर्म, जात, दिव्यांगत्व, मातृभाषा, शिक्षण, व्यवसाय, रोजगार आणि स्थलांतर यासंबंधी माहितीचा समावेश आहे.

परिषदेत जनगणना अधिनियम व नियम, पीई मोबाइल प, एचएलबीसी आणि सीएमएमएस पोर्टल, गणना क्षेत्रांची निश्चिती, जनजागृती आणि देखरेख यासंबंधी तांत्रिक सत्रे घेण्यात आली. मास्टर ट्रेनर्स, जिल्हा व चार्ज अधिकारी आणि तांत्रिक सहाय्यकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून क्षेत्रीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण सुरू आहे. यानंतर प्रगणक आणि पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात येणार आहे. परिषदेस नवी दिल्ली येथील भारताचे महानिबंधक कार्यालयाचे उपमहानिबंधक (सी अँड टी) जसपाल सिंग, सर्व विभागीय आयुक्त, राज्यातील प्रधान जनगणना अधिकारी, जनगणना कार्य संचालनालय, मुंबई तसेच महाराष्ट्र शासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# लातूरला २०१६ च्या दुष्काळात रेल्वेने पाणी आणणे हे राजकीय षडयंत्रच, आमदार अमित देशमुखांचा आरोप

**लातूर (प्रतिनिधी)–** लातूरला २०१६ मध्ये रेल्वेने पाणी आणण्याचा निर्णय हा राजकीय षडयंत्राचा भाग होता. माजी मुख्यमंत्री स्वर्गीय विलासराव देशमुख यांची प्रतिमा मलिन करण्यासाठीच त्यावेळी हे राजकारण करण्यात आलं, असा गंभीर आरोप काँग्रेस आमदार अमित देशमुख यांनी केलाय. त्यावेळी दुष्काळाचा सामना करणारे बीड, नांदेड आणि धाराशिव हे जिल्हे असतानाही केवळ लातूरलाच रेल्वेने पाणी आणण्यासाठी निवड का करण्यात आली? असा सवालही त्यांनी उपस्थित केलाय. लातुरात आयोजित एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे



आरोप केले आहेत. अशातच आमदार अमित देशमुख यांनी केलेल्या या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून त्यांच्या रोख नेमका कोणाकडे, यासंदर्भातही चर्चा रंगू लागली आहे.

दरम्यान, गेल्या अनेक वर्षांपासून राज्यात भाजपची सत्ता आहे. त्यामुळे आता भाजप सरकार रेल्वेने पाणीपुरवठा करणार नाही. कारण लातूरसाठी त्यांनी काय केलं, असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो, अशी खोचक टीकाही अमित देशमुख यांनी केलीय.

मराठवाड्यावर दुष्काळाचे ढग गडद होऊ लागले आहेत. विभागातील आठपैकी पाच जिल्हे सध्या डेंजर झोनमध्ये आले असून त्या जिल्ह्यातील ४ हजार ७३९ गावांतील ९ हजार १२२ योजनांसाठी आराखडा तयार केला आहे. जालना, बीड, लातूर, धाराशिव, परभणी या पाच जिल्ह्यांसाठी आगामी काळातील उपाययोजनांसाठी १५८ कोटी रुपयांची तरतूद पाण्यासाठी करावी लागेल. छत्रपती संभाजीनगर, नांदेड, हिंगोली या तीन जिल्ह्यांतील वस्तुनिष्ठ माहितीचे संकलन झाल्यानंतर त्या जिल्ह्यांचेही आराखडे येत्या आठवड्यात तयार होतील. साधारणतः ५० ते ७० कोटी दरम्यान आराखडे असतील, २०० कोटींच्या पुढे टंचाई आराखडा असेल, असे सूत्रांनी सांगितले. सर्व धरणांतील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याचे आदेश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी मागेच दिले आहेत. जायकवाडी, विष्णुपुरी वगळता कोणत्याही धरणात मुबलक पाणीसाठा नाही. त्यामुळे पिण्यासाठी पाणी आरक्षित करण्याचा निर्णय झाला आहे.

लातूर शहरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न लक्षात घेता जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी महापालिकेत पाणीपुरवठ्याचा आढावा घेतलाय. मांजरा धरणातील उपलब्ध पाणीसाठा आणि त्यातून शहराला करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्याची सद्यस्थिती याची माहिती यावेळी घेण्यात आली.

# मुंबईत २४ नोव्हेंबरपासून पुस्तक महोत्सव

**मुंबई (प्रतिनिधी)–** पुस्तकप्रेमी, साहित्यिक आणि वाचकांसाठी मुंबईत येत्या २४ नोव्हेंबरपासून सहा दिवसांचा पुस्तक महोत्सव रंगणार आहे. राष्ट्रीय पुस्तक न्यास, भारत (एनबीटी) यांच्या वतीने २४ ते २९ नोव्हेंबरदरम्यान मुंबई विद्यापीठाच्या कालीना परिसरात 'मुंबई पुस्तक महोत्सव २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात २०० प्रकाशकांचे ६०० हून अधिक पुस्तकांचे स्टॉल, नामवंत लेखकांशी संवाद, पुस्तक प्रकाशन सोहळे, विषयाधारित प्रदर्शने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी वाचकांना अनुभवता येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता महोत्सवाचे उद्घाटन होणार असून, प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे.

केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयांतर्गत कार्यरत राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या पुढाकाराने महाराष्ट्र शासन, मुंबई महानगरपालिका आणि मुंबई विद्यापीठ यांच्या सहकार्याने




हा महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. मुंबई विद्यापीठाच्या कलीना परिसरातील प्रवेशद्वार क्रमांक दोनजवळ महोत्सवाचे आयोजन होणार आहे. यासंदर्भातील घोषणा आयोजनस्थळी झालेल्या पत्रकार परिषदेत शनिवारी करण्यात आली. मुख्य आयोजक अमित साटम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या पत्रकार परिषदेला महोत्सवाचे मुख्य संयोजक आचार्य पवन त्रिपाठी, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे संचालक युवराज मलिक आणि मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अजय भामरे उपस्थित होते.

महोत्सवात विविध भारतीय भाषांमधील साहित्य, कथा, कादंबऱ्या, चरित्रे, बालसाहित्य आणि अन्य विषयांवरील पुस्तकांचा संग्रह उपलब्ध असेल. सहा दिवसांत १०० हून अधिक कार्यक्रम आणि सत्रे आयोजित करण्यात येणार आहेत. साहित्यिक संवाद, लेखकांशी गप्पा, पुस्तक प्रकाशन, विषयाधारित प्रदर्शने, बालकांसाठी विशेष उपक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा त्यात समावेश आहे. 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीताच्या १५० वर्षांच्या प्रवासावर आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त विशेष प्रदर्शनेही भरविण्यात येणार आहेत.

या महोत्सवात दिल्लीचे नायब राज्यपाल तरणजीत सिंह संधू, आचार्य प्रशांत, पॅरालिम्पिक खेळाडू दीपा मलिक, ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम, गीतकार मनोज मुंतशिर, चित्रपट दिग्दर्शक चंद्रप्रकाश द्विवेदी, अभिनेत्री व लेखिका शेफाली शाह, अंतराळवीर शुभांशू शुक्ला, अरुणा ढेरे, विश्वास पाटील, शरणकुमार लिंबाळे, अश्विन सांघी, आनंद नीलकंठन, अक्षत गुप्ता, अंजुम चोप्रा यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर सहभागी होणार आहेत. शशिकांत सावंत, मयूर शाह, राजीव श्रीखंडे, मेधा भास्करन, अंशुल चतुर्वेदी, एहसान वजीर, निकिता ठाकूर आणि प्रफुल्ल बिल्लौरे यांचीही उपस्थिती असेल. महोत्सवाचे मुख्य संयोजक आचार्य पवन त्रिपाठी यांनी सांगितले की, दररोज सकाळी १० ते दुपारी दोन या वेळेत बालकांसाठी विशेष उपक्रम, दुपारी १२ ते सायंकाळी पाच या वेळेत लेखक मंच आणि सायंकाळी सात ते रात्री १० या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतील. बालकांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्व वयोगटांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि समाजात पुस्तक संस्कृती रुजवणे हा महोत्सवाचा उद्देश आहे.

# बर्ड फ्लूवरील स्वदेशी लस बाजारात

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशातील पोल्ट्री व्यवसायाशी संबंधित शेतकऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. कोंबड्यांमध्ये वेगाने पसरणाऱ्या बर्ड फ्लू या गंभीर आजारापासून संरक्षण करण्यासाठी आता स्वदेशी लस उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे, या लसीच्या एका डोसची किंमत अवघी १ ते २ रुपये ठेवण्यात आली आहे. त्यामुळे मोठ्या पोल्ट्री फार्मसह कमी संख्येने कोंबड्यांचे पालन करणाऱ्या शेतकऱ्यांनाही याचा फायदा होण्याची अपेक्षा आहे.

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी शुक्रवारी भोपाळ येथे देशातील पहिली स्वदेशी बर्ड फ्लू लस देशाला समर्पित केली. H5N1 विषाणूपासून कोंबड्यांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने ही लस विकसित करण्यात आली आहे. बर्ड फ्लूमुळे पोल्ट्री उद्योगाला होणारे आर्थिक नुकसान कमी करण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

**पान ३ वरून**

**डॉ. बानाई महाराष्ट्र राज्य....**

पी. के. त्रिभुवन यांनी सन २०२६ ते २०२८ करिता नवीन निवडून आलेली राज्य कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. त्यात इंजि. संजीवन गायकवाड यांची बानाई महाराष्ट्र राज्य, जनरल सेक्रेटरीपदी निवड करण्यात आली.

नवनिर्वाचित बानाई, महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी याप्रमाणे – अध्यक्ष: इंजि.पांडुरंग शेलार (पुणे), उपाध्यक्ष : इंजि. एम.जे. वाघमारे (मुंबई), उपाध्यक्ष : भास्कर एच. खोब्रागडे (नागपूर), जनरल सेक्रेटरी : इंजि. संजीवन ए.गायकवाड (नांदेड), सहसचिव: इंजि. विजय कांबळे (पिंपरी चिंचवड), कोषाध्यक्ष : इंजि.श्यामराव सावळे (हिंगोली), अंतर्गत तपासणीस : इंजि. भरत कानिंदे (परभणी), कार्यकारिणी सदस्य : प्राचार्य इंजि. रेवतकुमार बोरकर (नागपूर), इंजि. अनिल खडसे (वर्धा), इंजि. सौ. मीना मेश्राम (नागपूर), इंजि. किशोर सवाने (चंद्रपूर), इंजि. विजय मंगळे, (धुळे), इंजि. दादाराव वाकोडे (संभाजीनगर), इंजि. नवनाथ शिंदे (लातूर), सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आलेल्या प्रमुख ३ ठरवाचे वाचन इंजि. प्रदीप नगरारे, नागपूर यांनी केले.

नांदेड जिल्ह्यातून इंजि. संजीवन गायकवाड, इंजि. राजेंद्र टोके, इंजि. गौतम येसनकर, इंजि. जवळेकर, इंजि. सी.बी. चिखलीकर, इंजि. घनचेकर, इंजि. चंदा बुक्तरे, इंजि. भारत कानिंदे हे उपस्थित होते.


## Change In Name

My old name is **AARTI SHYAM WANGIKAR** Which now I am Changing as New Name: **ARATI SHYAM WANGIKAR** Hence, forth my all correspondence. Will be done as per my New Name. Please consider, the same.

**Address - Flat No 202 prapti Height, Rajesh Nagar Taroda Naka, Nanded - 431605**

## Change In Name

My old Name is **UZMA PARVEEN KHAN** Which now I am Changing as New Name **UZMA PARVEEN AYAN ALAM KHAN.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**Address: S.NO.266, P.NO.87, DR. APJ ABDUL KALAM COLONY, NEAR MALHAR CHOWK, SANGVI BYPASS ROAD, SANGVI BK, NANDED - 431605 Mob: 8149474945**

जाहिर प्रगटन

गोकुलधाम रो हाऊस ओनर्स को-ऑप हौसिंग सोसायटी म.गट. न.4 कौठा ता.जि.नांदेड

नोंदणी क्र.एनएनडी/एनएनडी/एचएसजी/टीओ/671/2023 दिनांक 28/09/2023.

गोकुलधाम रो-हाऊस ओनर्स का-ऑप हौसिंग सोसायटी मर्यादित गट न.4 कौठा नांदेड,ता.जि.नांदेड संस्थेची पंचवार्षीक निवडणुक सन 2026 ते 2031 साठीची प्रारूप मतदान यादी संस्थेचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर येथे लावण्यात आलेली आहे.सदर मतदान यादीवर संस्थेच्या सभासदापैकी कुणाचा आक्षेप असल्यास दिनांक 20/11/2026 ते 29/11/2026 पर्यंत संस्थेचे अध्यक्ष/सचिव व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरुपात आक्षेप नोंदवावेत.कृपया सदर तारखेनंतर आलेले आक्षेपांचा विचार केला जाणार नाही याची सभासदांनी नोंद घ्यावी

संजीव सुभाषराव शिंदे
निवडणूक निर्णय अधिकारी
गोकुलधाम रो-हाऊस ओनर्स का-ऑप हौसिंग सोसायटी
मर्यादित गट न.4 कौठा नांदेड,ता.जि.नांदेड.
मोबाईल :- 9766319533.

अध्यक्ष/सचिव
गोकुलधाम रो-हाऊस ओनर्स का-ऑप हौसिंग सोसायटी
मर्यादित गट न.4 कौठा नांदेड,ता.जि.नांदेड.
मोबाईल :-

## जाहीर प्रगटन

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बिलोली यांचे न्यायालय**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २५७/२०२६**
**शामाबाई पोशट्टी दारसेवाड व इतर वि. निरंक**

अर्जदार : १. शामाबाई भ्र. पोशट्टी दारसेवाड वय – ६५ वर्षे,
२. राजु पिता पोशट्टी दारसेवाड वय – ४० वर्षे,
३. संजय पिता पोशट्टी दारसेवाड वय ३७ वर्षे,
सर्व रा. बिलोली ता. बिलोली जिल्हा नांदेड

**विरूध्द**
**निरंक**

**विषय :– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.....**

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत पोशट्टी हुस्साजी दारसेवाड यांची अर्जदार क्र. १ ही पत्नी आहे. अर्जदार क्र. २ व ३ हे मुले आहेत. सर्व रा. बिलोली ता. बिलोली जिल्हा नांदेड येथे वास्तव्यास आहेत. मयत पोशट्टी हुस्साजी दारसेवाड यांचा मृत्यु दिनांक २७/१२/२०२५ रोजी त्याचे राहते घर बिलोली ता. बिलोली जिल्हा नांदेड येथे झाला. मयत पोशट्टी हुस्साजी दारसेवाड यांचे अर्जदारा व्यतीरिक्त इतर कोणीही वारस नाहीत. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत पोशट्टी हुस्साजी दारसेवाड यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक २४/१२/२०२६ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. ०३ नोव्हेंबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

**सहा. अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय क. स्तर, बिलोली**




## जाहीर प्रगटन

**४थे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, नांदेड यांच्या न्यायालयात**
**ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्रमांक १७१८/ २०२६**
**गजानन विरूद्ध ग्रामसेवक**

अर्जदार
**गजानन पि. गोविंदराव पुयड वय ४६ वर्ष धंदा मजुरी रा. विजयनगर ता. नांदेड जि. नांदेड**
**गैरअर्जदार – ग्रामसेवक ग्रामपंचायत वाडीपुयड ता.जि. नांदेड.**

**दावा**

जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ अंतर्गत अर्ज

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार गजानन पि. गोविंदराव पुयड वय – ४६ वर्ष. धंदा– मजुरी, रा. विजयनगर, ता.नांदेड जि. नांदेड यांनी या न्यायालयात त्यांचे नामे गजानन पि. गोविंदराव पुयड यांच्या जन्माच्या नोंदीबाबत आदेश होणेसाठी अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये त्याने गजानन पि. गोविंदराव पुयड याचा जन्म दिनांक २०/३/१९८० रोजी मौजे वाडी पुयड येथे झाला असे नमुद केले आहे. सदर अर्जदाराला गजानन पि. गोविंदराव पुयड यांचे नावे जन्म प्रमाणपत्र देण्यासाठी जर कोणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक ०४/०१/२०२७ रोजी सकाळी ११:०० वाजता लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणासही आक्षेप नाही असे समजून योग्य तो निर्णय दिला जाईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक २१/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

लिपीक
४ थे फौजदारी
न्यायालय, नांदेड

सहा. अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी
न्यायालय, नांदेड

## जाहीर प्रगटण

सर्व जनतेस व सर्व संबंधीतास या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, दि.टिळक नगर को-ऑप.हौसिंग सोसायटी (म.) नांदेड येथील वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड सर्वे क्र.38 वर ज्याचा सि.स.नं.8441 आहे. संस्थेचे मुळ प्लॉटधारक श्री लव मोहनराव व श्री कुश मोहनराव देशमुख यांच्या प्लॉट क्र.6 च्या भागावर श्री योगेश्वर कंन्स्ट्रक्शन तर्फे प्रो.प्रा.हणमंत तुकाराम रपकाळ रा.लक्ष्मीनारायण नगर, नांदेड यांनी बांधकाम केलेल्या एकदंत अपार्टमेंट या ईमारतीतील यांचे हिश्याचे ताब्यामधील फ्लॅट क्र.401 लिहुन घेणार / खरेदीदार श्री नागनाथ मधुकर कागणे यांना कायमचा विक्री केलेला आहे.

ज्याची एकुण चतुःसिमा पुढीलप्रमाणे आहे. पुर्वेस - फ्लॅट क्र.402 व पायऱ्या आहेत, पश्चिमेस - मार्जिनल मोकळी जागा आहे व नंतर श्री अंभोरे व बुलबुले यांची मिळकत 18545 आहे., दक्षिणेस - मोहन अपार्टमेंट इमारत आहे., उत्तरेस - मार्जिनल मोकळी जागा आहे व नंतर श्री मुत्तलवार यांचे पी.आर.कार्ड क्र.18513 वरील घर आहे.

उपरोक्त वर्णनाच्या फ्लॅट क्र.401 हा श्री नागनाथ मधुकर कागणे, वय 42 वर्षे, व्यवसाय नौकरी रा.हिबाट मोटरगा ता.मुखेड जि.नांदेड यांना रू.35,00,000/- (अक्षरी पस्तीस लक्ष रूपये) एवढ्या किमतीस श्री हणमंत तुकाराम रपकाळ, रा.लक्ष्मीनारायण नगर, नांदेड यांनी कायमचा विक्री केलेला आहे. तसेच ईसारापोटी दि.11.09.2026 रोजी धनादेश क्र.043741 द्वारे रू.7,00,000/- एवढी रक्कम लिहुन देणार यांना देण्यात आली आहे व उर्वरीत रक्कम रू.28,00,000/- (अक्षरी अठ्ठावीस लक्ष रूपये) एवढी रक्कम रजिस्ट्रीच्या दिवशी देण्याचे ठरले आहे.

तरी उपरोक्त व्यवहारावर कोणाचा कोणताही, जागेचा आर्थिक / वाटणी / हिस्सा, कुळ, कर्ज, खाजगी अथवा सहकारी संस्था तथा सरकारी कर्जाचा काही बोजा ई.असल्यास संस्थेच्या सचिव अथवा अध्यक्षाकडे आपला लेखी कागदपत्रासह काही आक्षेप, उजर, हितसंबंध असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून 7 दिवसाचे आत लेखी पुराव्यासह संस्थेकडे द्यावा. मुदतीनंतर कोणाचाही आक्षेप स्विकारल्या जाणार नाही. त्यानंतर फ्लॅट क्र.401 हा श्री हणमंत तुकाराम रपकाळ यांचे नावावरून श्री नागनाथ मधुकर कागणे यांच्या नावावर हस्तांतरीत करण्यात येईल, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी म्हणुन हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध करीत आहोत.

जाहीर प्रगटन देणार
**अध्यक्ष**
दि.टिळक नगर को-ऑप.हौसिंग सोसायटी (म.) नांदेड

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# वैयक्तिक शेततळे घटकासाठी प्रतीक्षा यादीतील सर्व १०० टक्के अर्जांची निवड

## दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना मोठा दिलासा

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यात पर्जन्याधारित शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढविण्याकरिता शासनाने अनुदान तत्त्वावर सुरू केलेल्या वैयक्तिक शेततळे योजनेमुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात व उत्पन्नात वाढ होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे. सद्यस्थितीमध्ये सन २०२६-२७ या वर्षात एल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमध्ये संरक्षित सिंचनाचा खात्री असणाऱ्या शेततळे घटकाकरिता भर देण्याच्या शासनस्तरावरून सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्या अनुषंगाने वैयक्तिक शेततळे घटकाकरिता महा-डीबीटी पोर्टलवर प्रतीक्षा यादीत असणाऱ्या १०० टक्के अर्जांची निवड करण्यात आली आहे. त्यानुसार एकूण ८७ हजार १७४ शेतकऱ्यांची निवड करण्यात आलेली असून त्यामध्ये अनुसूचित जाती ३ हजार ९२५, अनुसूचित जमाती ५ हजार ३९७ तर इतर ७७ हजार ८७० या प्रमाणे प्रवर्गनिहाय शेतकऱ्यांचा समावेश आहे.

निवड झालेल्या शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे जसे की, हमीपत्र (परिशिष्ट २), आवश्यकतेनुसार जातीचा दाखला, दिव्यांग प्रमाणपत्रे महा-डीबीटी पोर्टलवर अपलोड करण्याबाबत नोंदणीकृत भ्रमणध्वनीवर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात आले आहे. निवड झालेल्या सर्व शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की, शेतकऱ्यांनी सदर लघुसंदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत कागदपत्रे महा-डीबीटी (आपले सरकार) पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे. कागदपत्रे अपलोड करताना ती सुस्पष्ट व अद्ययावत असावीत. जे शेतकरी विहित मुदतीत कागदपत्रे अपलोड करणार नाहीत त्यांची निवड रद्द होईल. पुढील प्रत्येक टप्प्यावर शेतकऱ्यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत वेळोवेळी भ्रमणध्वनीवर लघुसंदेशाद्वारे तसेच महा-डीबीटी पोर्टलद्वारे सूचित करण्यात येईल.

निवड झाल्यानंतर व पूर्वसंमती मिळाल्यानंतर सर्व अटी व शर्तींची पूर्तता करून शेततळे विहित वेळेत पूर्ण करणारे शेतकरी अनुदानास पात्र राहतील, याची सर्वांनी नोंद घ्यावी. योजनेसंदर्भात अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या तालुका कृषी अधिकारी कार्यालय अथवा जवळच्या कृषी विभागाच्या इतर कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन पुणे कृषी आयुक्तालयाचे संचालक (मृसं व पाक्षेव्य) डॉ. मेघना केळकर यांनी केले आहे.

# वसरणी शिवारात जुगार अड्ड्यावर छापा; १६ आरोपींसह १० लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील वसरणी येथील शेतात चालणाऱ्या 'झन्ना-मन्ना' जुगार अड्ड्यावर छापा टाकून १६ आरोपींसह १० लाख १७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला असून, या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण हद्दीत गुन्हे शोध पथकाने कौठा-वसरणी शिवारातील एका शेतात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर मोठा छापा टाकला. या कारवाईत १६ आरोपींकडून रोख रक्कम, मोबाईल फोन, एक चारचाकी वाहन आणि दोन दुचाकी असा एकूण १० लाख १७ हजार ४८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक २० नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री पोलीस ठाणे नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक यांनी हद्दीतील अवैध धंद्यांची माहिती काढून कारवाई करण्याचे आदेश गुन्हे शोध पथकाला दिले होते. त्यानुसार सदरचे गुन्हे शोध पथक खाजगी वाहनाने हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मध्यरात्रीच्या सुमारास पथकाला गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, कौठा-वसरणी येथील शेत गट क्रमांक २-६ मध्ये प्रदीप उर्फ सोहम रोहत्रे हा आपल्या शेतातील मोकळ्या जागेत काही इसमांसह पत्त्यांवर पैसे लावून 'झन्ना-मन्ना' नावाचा जुगार खेळत आणि खेळवित आहे.

सदर माहितीच्या आधारे पथकाने दोन पंचांच्या समक्ष घटनास्थळी छापा टाकला. यावेळी १६ इसम नामे-१. प्रदीप उर्फ सोहम लालचंद रोहत्रे (वय ३८, रा. शनी मंदिराजवळ, जुना मोंढा, नांदेड) २. शेख मोहसिन शेख बाबु (वय ३२. रा. वाजेगाव, ता. जि. नांदेड) ३. सौरभ साहेबराव चौदंते (वय २५, रा. तान्हाजीनगर, नांदेड) ४. शुभम राजेंद्रसिंह चव्हाण (वय २६, रा. गाडीपुरा, नांदेड) ५. अब्दुल सलाम अब्दुल समर (वय ३५, रा. उमर कॉलनी, देगलूर नाका, नांदेड) ६. कृष्णा रावसाहेब कदम (वय ३५, रा. गोपाळ नगर, सांगवी. नांदेड) ७. सिद्धांत सागर यादव (वय ३०,रा. वजिराबाद,नांदेड)८. प्रवीण जुगलकिशोर धुत (वय ३७. रा. सराफा, जुना मोंढा, नांदेड) ९.अभिजीत अर्जुन औसेकर (वय २८, रा. जुना मोंढा, नांदेड) १०. फिरोज खान वाहिद खान पठाण (वय ३८, रा.बालाजी नगर, हिंगोली नाका, नांदेड) ११. सुनिल प्रतापसिंह लाला (वय ३०, रा. माळटेकडी. नांदेड) १२. सरताजसिंग अजीतसिंग (वय ३३. रा.अबचलनगर, नांदेड) १३. सय्यद हुसेन सय्यद युसूफ (वय ३०. रा. वाजेगाव,



नांदेड) १४. राजेश रामराव हंबर्डे (वय ३९. रा. विष्णुपुरी, नांदेड) १५. नारायण बळीराम चिटलेवार (वय ५२, रा. एमआयडीसी बळीरामपूर, नांदेड) १६. सतपालसिंग जसपालसिंग हांडी (वय ३२, रा. अबचलनगर,नांदेड) हे गोल आकारात बसून बदक छाप पत्त्यांवर पैशांची बाजी लावून जुगार खेळताना रंगेहात आढळून आले.

पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेऊन पंचासमक्ष अंगझडती व घटनास्थळावरुन १) एक फोर्ड कंपनीची फिगो कार (क्र. MH २० EE १०७६) किंमत ४,५०,००० रुपये. २) दोन दुचाकी वाहने (क्र. MH २६ DD ७११८) (क्र. MH २६ C ३३३९) - किंमत २,१०,००० रुपये. ३) विविध कंपनीचे ११ मोबाईल फोन एकूण किंमत ३,३५,००० रुपये. ४) रोख रक्कम व इतर साहित्य २२४८० रुपये आणि जुगार खेळण्याचे बदक छाप असा एकुण १०,१७,४८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## कॅरीबॅगचा वापर करणाऱ्या पाच व्यावसायिकांविरुद्ध दंडात्मक कार्यवाही

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांवाशमनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत २१ नोव्हेंबर रोजी स्वच्छता निरीक्षक अर्जुन बागडी व मनपा कर्मचारी यांनी कॅरीबॅगचा वापर करणाऱ्या पाच व्यावसायिकां विरुद्ध दंडात्मक कारवाई केली. स्वच्छता ठेवण्यासाठी साफसफाई करून कचरा संकलन करण्याच्या सुचना देऊन कचरा कचरा गाडीत टाकण्याचा सुचना देण्यात आल्या असून, या कार्यवाहीमुळे खळबळ उडाली आहे.

नांवाशमनपाचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या आदेशानुसार स्वच्छता विभागाचे सहायक आयुक्त रावण सोनसळे व सिडको क्षेत्रीय कार्यालय सहायक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता निरीक्षक अर्जुन बागडी व मनपा कर्मचारी यांनी सिडको परिसरातील महाराणा प्रताप चौक परिसरात २१ नोव्हेंबर रोजी सकाळी पाच व्यावसायिकाविरुद्ध कॅरीबॅग वापर करणाऱ्यांविरूद्ध दंडात्मक कार्यवाही केली. यावेळी व्यावसायिकांनी साफसफाई व कचरा अस्ताव्यस्त पसरल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर कचरा साफसफाई करून कचरा गाडीत टाकण्याच्या सुचना दिल्या. या कार्यवाहीमुळे खळबळ उडाली असून ही कार्यवाही चालुच राहणार असल्याचे स्वच्छता निरीक्षक अर्जुन बागडी यांनी सांगितले आहे.



**भोकर –** तालुक्यातील मौजे कामनगाव येथे सुरू असलेल्या राज्यस्तरीय दुसऱ्या पाणी सप्ताहानिमित्त दि. २१ नोव्हेंबर २०२६ रोजी खासदार रवींद्र चव्हाण, नांदेड उत्तरचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष तिरुपती पाटील कोंढेकर, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गोविंद बाबागौड पाटील आदींनी भेट दिली. यावेळी श्रमदान करताना उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक संजय देशमुख कामनगावकर, सेवा समर्पण परिवाराचे अध्यक्ष दिगंबर देशमुख, सचिव विठ्ठल फुलारी, सेवा समर्पण परिवार व ग्रामस्थ दिसत आहेत.

# माँ गंगा गोदावरी पर्यावरणपूरक महाआरती व दीपोत्सवाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** श्री स्वामी समर्थ मंदिर व अन्नछत्र, सोमेश कॉलनी, नांदेड व सहभागी सामाजिक संस्था यांच्यामार्फत प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षी त्रिपुरारी पौर्णिमेला माँ गंगा गोदावरी पर्यावरणपूरक महाआरती व दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

दक्षिण गंगा म्हणून प्रसिद्ध असलेली व आपली जीवनदायीनी माँ गंगा गोदावरीचे उगमस्थान नाशिक त्र्यंबकेश्वर असून, त्रिपुरारी पौर्णिमेला भगवान शिवाने त्रिपुरासुराचा वध केल्यानंतर देवतांनी आनंद साजरा करण्यासाठी प्रकाशोत्सव (देवदिवाळी) साजरा केला. याच प्रथेनुसार गोदावरीच्या तीरावरील घाटांवर संध्याकाळी शेकडो-हजारो दिवे प्रज्वलित करून दीपदान केले जाते. हा सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

आज परिस्थितीला गोदावरी नदी ही प्रदूषणाच्या विळख्यात अडकलेली असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये सांडपाणी व कचरा टाकण्यात येतो. त्यामुळे पाणी प्रदूषित होऊन पिण्यायोग्य राहत नाही व जलचर प्राणी मोठ्या प्रमाणात मरण पावत आहेत. आपल्याला माँ गंगा गोदावरीचे गत वैभव पुनश्च प्राप्त व्हावे म्हणून जनजागृती व्हावी व माँ गंगा गोदावरी प्रदूषणमुक्त व्हावी या उद्देशाने साधारणपणे साडेतीन वर्षापासून माँ गंगा गोदावरी स्वच्छता संकल्प अभियान श्री स्वामी समर्थ मंदिर व अन्नछत्र यांच्या माध्यमाने करण्यात येत आहे.

# पत्रकार गजानन पाटील यांची भाजप ग्रामविकास व पंचायतराज प्रकोष्ठच्या जिल्हा संयोजकपदी निवड



**हदगाव (प्रतिनिधी)–** भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र प्रदेशच्यावतीने संघटनात्मक बांधणीला अधिक वेग देत ग्रामविकास व पंचायतराज प्रकोष्ठच्या जिल्हा संयोजकपदी ज्येष्ठ पत्रकार गजानन पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या सूचनेनुसार आणि माजी आमदार सुनील राणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. खासदार अशोकराव चव्हाण, प्रदेश प्रभारी सुधाकरराव भोयर आणि प्रदेश संयोजक रामचंद्र तिरुके यांच्या नेतृत्वाखाली ही महत्त्वाची जबाबदारी गजानन पाटील यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

गजानन पाटील हे गेल्या २५ वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात अत्यंत सक्रियपणे कार्यरत आहेत. केंद्र आणि राज्य सरकारच्या ग्रामविकासाशी संबंधित विविध लोककल्याणकारी योजना ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे तसेच जिल्ह्यातील ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषद स्तरावर पक्षाची विचारधारा आणि धोरणे अधिक मजबूत करणे. त्याचबरोबर ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा आणि शेतकऱ्यांच्या समस्या शासन दरबारी मांडून त्या सोडवण्यासाठी पाठपुरावा करणे, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बुथ पातळीपासून ते जिल्हा पातळीपर्यंत कार्यकर्त्यांची फळी भक्कम करणे आदी कामावर त्याचा फोकस राहणार आहे.

गजानन पाटील यांच्या या निवडीमुळे नांदेड जिल्ह्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# ६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत 'जेनवेव' नाटकाचे सादरीकरण

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने आयोजित ६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेच्या नांदेड केंद्रावर शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर रोजी 'जेनवेव' या नाटकाचे सादरीकरण करण्यात आले. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, नांदेड येथे सायंकाळी ७ वाजता हा नाट्यप्रयोग पार पडला. तन्मय ग्रुप, नांदेड यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या या नाटकाचे लेखन गोविंद जोशी यांनी केले असून दिग्दर्शन अंकिता देव-जोशी यांचे आहे.

'कालचे संस्कार, आजचे विचार, उद्याचे भविष्य!' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित असलेले 'जेनवेव' हे नाटक तीन पिढ्यांच्या भावविश्वाचा, विचारांचा आणि नातेसंबंधांमधील संवादाचा वेध घेते.

आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात जग झपाट्याने बदलत आहे. तंत्रज्ञानामुळे संवादाची साधने वाढली असली, तरी माणसांमधील भावनिक जवळीक, संवेदनशीलता आणि नात्यांमधील समजूतदारपणा टिकवून ठेवण्याचे आव्हान अधिक महत्त्वाचे बनले आहे. नव्या पिढीचे विचार, ज्येष्ठ पिढीचे अनुभव आणि मधल्या पिढीची भूमिका यांचा सुरेख संगम या नाटकातून मांडण्यात आला आहे.



नाटकातील शुभांगी ही भूमिका वत्सला मोरे, मिताली ही भूमिका शुभांगी कुलकर्णी, तर परी ही भूमिका राजेश्वरी जोशी यांनी साकारली आहे. या तीन पात्रांच्या माध्यमातून पिढ्यांमधील विचारभिन्नता, नात्यांमधील भावनिक गुंतागुंत, तंत्रज्ञानाचे आकर्षण, स्वप्ने, अपेक्षा आणि भविष्याची आव्हाने उलगडण्यात आली आहेत.

नाटकाच्या तांत्रिक बाजूची जबाबदारीही कुशलतेने सांभाळण्यात आली. नेपथ्य अभिनव जोशी, प्रकाश योजना विवेक भोगले, रंगभूषा वैशाली गुंजकर, वेशभूषा संध्या संगेवार आणि संगीत कमलेश सारंगधर यांनी सांभाळले.

# नांदेड येथे २३ नोव्हेंबर रोजी शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा

## आयटीआय उत्तीर्ण उमेदवारांसाठी १ हजार जागांची संधी; नामांकित कंपन्यांचा सहभाग

**नांदेड (प्रतिनिधी)–** मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र नांदेड व श्री गुरुगोबिंदसिंघजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वा. आयटीआय उत्तीर्ण उमेदवारांसाठी शिकाऊ उमेदवारी योजनेंतर्गत (PMNM) भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या भरती मेळाव्यामध्ये सर्व इंजिनिअरिंग व नॉन इंजिनिअरिंग ट्रेडमधील आयटीआय उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांना शिकाऊ उमेदवार म्हणून संधी उपलब्ध करून देण्यात येणार असून, एकूण १ हजार उमेदवारांची भरती केली जाणार आहे.

या मेळाव्यामध्ये **TT DLT, MHINDR, BJJ, FIT, UROPLEX, LER, SNY WIND, HIR, JBIL, BURE, FEROCI** आणि **VICTORI** या नामांकित औद्योगिक कंपन्या सहभागी होणार आहेत. इच्छुक आयटीआय उत्तीर्ण उमेदवारांनी सोमवार २३ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वा. श्री गुरुगोविंदसिंघजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था नांदेड येथे आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे.

# रुचिरा बेटकर यांना लोकसंवाद उत्कृष्ट साहित्य पुरस्कार जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कथाकार दिगंबर कदम यांच्या पुढाकारातून गेल्या २२ वर्षांपासून सातत्याने आयोजित करण्यात येणाऱ्या लोकसंवाद ग्रामीण राज्यस्तरीय साहित्य संमेलनाच्या वतीने दिला जाणारा यंदाचा 'लोकसंवाद उत्कृष्ट साहित्य पुरस्कार' कवयित्री रुचिरा बेटकर यांच्या 'कोलाज भावनांचा' या कवितासंग्रहाला जाहीर झाला आहे.



यंदाचे २२ वे लोकसंवाद ग्रामीण राज्यस्तरीय साहित्य संमेलन येत्या २८ नोव्हेंबर रोजी गोदावरी इंटरनॅशनल स्कूल, शिवमळा, मरळक रोड, नांदेड येथे सुप्रसिद्ध विचारवंत, लेखक तथा पत्रकार आसाराम लोमटे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनानिमित्त साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी देण्यात येणाऱ्या 'लोकसंवाद उत्कृष्ट साहित्य पुरस्कारासाठी' रुचिरा बेटकर यांच्या 'कोलाज भावनांचा' या कविता संग्रहाची निवड करण्यात आली आहे.

# मटका व जुगार अड्ड्यांवर पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाच्या धाडी

## ३० इसमांविरुद्ध कारवाई, ४३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** परिक्षेत्रांतर्गत लातूर जिल्ह्यात अवैध व्यवसाय सुरू असल्याबाबतच्या तक्रारी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना प्राप्त झाल्या होत्या. त्यावरून त्यांनी आपल्याकडील अधिकारी व अंमलदारांचे एक पोलीस पथक लातूर जिल्ह्यात रवाना केले होते.

या पथकाने दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील राजीव गांधी चौक ते कन्हेरी चौक रोडवरील राज ऑटोमोबाईलच्या बाजूला असलेल्या राजू हौसे यांचे पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या मटका बुकीवर कारवाई करत, त्या ठिकाणाहून १२,९५० रुपयांची रोकड व २४ हजार रुपयांचे ३ मोबाईल असा एकूण ३६ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात एकूण ४ इसमांविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गुरनं ५६३/२०२६ कलम १२ (अ), ४, ५ महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदविला आहे.

त्याचप्रमाणे याच पोलीस ठाणे हद्दीतील जुना रेणापूर नाका येथील वेस्ट साईड मॉलचे पाठीमागील पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या मटका बुकीवर कारवाई करत, त्या ठिकाणाहून ४,३८० रुपयांची रोकड व २०,५०० रुपयांचे ३ मोबाईल असा एकूण २४,८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमूद प्रकरणात एकूण ६ इसमांविरुद्ध कारवाई करून, त्यांचेविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गुरनं ५६४/२०२६ कलम १२ (अ), ४, ५ महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदविला आहे.

तद्नंतर पथकाने लातूर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत बाभळगाव येथील किरण बालाजी मस्के याचे शेतातील आखाड्यावर पत्र्याचे शेडमध्ये तिर्रट नावाचा जुगार खेळणाऱ्यांविरुद्ध कारवाई करत, ९२,३५० रुपयांची रोकड, २४ मोबाईल, ८ मोटार सायकली व ४ चारचाकी वाहने असा एकूण ४२ लाख ४७ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात एकूण २० इसमांविरुध्द कारवाई करुन, त्यांचेविरुद्ध लातूर ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुरनं २९८/२०२६ कलम ४,५ महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदवला आहे.



उपरोक्त प्रमाणे लातूर जिल्ह्यातील ३ कारवायांत, पथकाने एकूण ३० इसमांकडून १ लाख ०९ हजार ६८० रुपयांची रोकड, ३० मोबाईल, ८ मोटारसायकली व ४ चारचाकी वाहने असा एकूण ४३ लाख ०९ हजार १८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ. प्रदीप खानसोळे, पोहेकॉ. गणेश राठोड, पोहेकॉ. संदीप वाघाडे व पोहेकॉ. गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

# सुभाष क्षीरसागर यांचे निधन

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील नांदला येथील ज्येष्ठ नागरिक, सुभाषराव ग्यानोजी क्षीरसागर (वय ५८ वर्षे) यांचे शनिवार, दि. २१ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर रविवार, दि. २२ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वा. मौजे नांदला ता.अर्धापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. सुभाषराव क्षीरसागर यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते नांदला येथील पोलीस पाटील अवधूत क्षीरसागर यांचे काका होत.

# जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात २३ नोव्हेंबरच्या सकाळी ६ वाजेपासून ते ७ डिसेंबर २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात ७ डिसेंबरच्या सकाळी ६ वाजेपासून ते २७ डिसेंबर २०२६ रोजीच्या मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहील. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमूद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही. अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com